# ।। सतस्वरूप आनंदपद ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। सतस्वरूप आनन्द पद ने:अक्षर निजनांव या ग्रंथाचे भाषांतर ।।

।। चोपाई ।।

**भेद सहेत ग्यान घट आवे ।। प्रेम भाव न्हेचो मन पावे ।।**
**मोख मिलण की येहे उपाई ।। दूजी नही सिष्ट मे भाई ।।१।।**

त्रिगुणी माया,पारब्रम्ह,सतस्वरुप वेगळे वेगळे आहे असे भेदासोबत सतस्वरूप आनंद पद ने:अक्षर(ने:अंछर)निजनावचे ज्ञान म्हणजे सतस्वरुप वैराग्य विज्ञान घटात प्रगट होतो व त्याच्याने हंसाच्या निजमनाला प्रेम येते तसेच भाव प्रगटतो व हंसाचे निजमन परममोक्ष मिळाला म्हणून निश्चिंत होऊन जातो.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, होणकाळ सृष्टीत परममोक्ष मिळण्याचा हाच उपाय आहे दुसरा कोणता उपाय होणकाळ सृष्टीत नाही.

**ओ तो जीव ब्रम्ह सुण होई ।। यां कूं पकड़ सके नही कोई ।।**
**सब ही क्रम जीव इण साया ।। सुख के काज जक्त हुवो भाया ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील मायावी ज्ञानींना,ब्रम्हज्ञानींना व जगातील लोकांना सांगत आहे की,जीव आधी ब्रम्ह होता आणि आज ही ब्रम्ह आहे हा ब्रम्ह आहे म्हणून याला त्रिगुणी मायेचे कर्म पकडू शकत नाही.जीव कर्म करेल तरच कर्म होतील आणि हा जीव कर्म करणार नाही तर कर्म होणार नाही अशाप्रकारे त्रिगुणी मायेचे सर्व कर्म जीवाच्या आश्रीत आहे.जीवाला होणकाळ पारब्रम्हमध्ये सुख नव्हते म्हणून हा जीव त्रिगुणी मायेचे सुख घेण्याकरीता खाली त्रिगुणी मायेच्या जगात आला आणि सुखाकरीता त्रिगुणी मायेचे कर्म केले. ।।२।।

**ब्रम्ह जहाँ सुण सुख दुख नाही ।। लेणा एक न देणा कांही ।।**
**तां कारण ओ खेल बणायो ।। पांच भूत कर संग हुय आयो ।।३।।**

हा जीव आधी जेथे राहत होता तो होणकाळ ब्रम्ह आहे त्या ब्रम्हमध्ये जीवाला सुख व दु:ख नव्हते कोणत्या प्रकारचे कोणाशी घेणे नव्हते तसेच कोणत्या प्रकारचे कोणाला देणे नव्हते.जीवब्रम्ह सोबत मन व ५ आत्मा अशी माया होती या जीवाला व त्याच्या मनाला पाच आत्मापासून वासनेचे सुख पाहिजे होते पाच आत्मा जोपर्यंत पूर्ण देह रुप धारण करीत नाही तोपर्यंत जीवा सोबत पाच आत्मा असूनही जीवाला सुख मिळत नव्हते याकरीता जीवाने होणकाळी शरीर धारण करुन त्रिगुणी मायेचा संग करुन पाच आत्म्यांचे आकाश,वायु,अग्नी, जल,पृथ्वी असे पाच प्रकारचे तत्व तयार केले त्याचा घट बनविला आणि त्याच्यात ह्या पाच वासनांचे सुख घेण्याकरीता विराजमान झाले असा याच जीवानेच खेळ बनविला. ।।३।।

।। कुंडल्या ।।

**ग्यानी सब ही सांभळो ।। जीव क्हो कुण होय ।।**

किसा लोक सूं आवीयो ।। सोझ बताओ मोय ।।
सोध बतावो मोय ।। ऊलट क्हाँ लग गया भाई ।।
ब्होर न जन्मे आय ।। क्हां लग पूगां जाई ।।
सुखराम केहे वा दोड़ कहो ।। कुण बळ पूगे कोय ।।
ग्यानी सब ही सांभंळो ।। जीव कहो कुण होय ।।१।।

सर्व ज्ञानींनो ऐका,हा जीव कोण आहे?कोणत्या लोकातून आला?हे शोधून सांगा आणि पारब्रम्ह मधून जसा खाली आला तसा मायेच्या लोकातून उलटून वरती कोठे पोहचल्यावर तो मायेत पुन्हा जन्म घेणार नाही ती जागा सांगा(दाखवा)आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व मायेच्या ज्ञानी व ब्रम्हज्ञानींना सांगतात त्या जागी पोहचण्याची विधी सांगा आणि कोणाच्या बळाने पोहचेल हे शोधून सांगा. ।।१।।

जीव ब्रम्ह सूं आवियो ।। जीव ब्रम्ह ही होय ।।
तो फिर आसी जाय कर ।। तामे फेर न कोय ।।
ता मे फेर न कोय ।। जीव ओ साहेब होई ।।
तो फिर आसी जाय ।। रीत आदू कहुँ तोई ।।
सुखराम आद घर पूंचिंया ।। निर्भे किस बिध होय ।।
जो पेली सुं आवियो ।। तो अब किंऊ नही आवे जोय ।।२।।

जीव ब्रम्हमधून आला येथे ब्रम्ह म्हणजे पूर्ण वैरागी मायारहीत ज्ञानरुप असे ज्ञानी समजतात होणकाळ ब्रम्ह समजत नाही मायेपासून पूर्ण मुक्त आहे असे समजतात. ब्रम्हज्ञानींनी आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना उत्तर दिले की,जीव हा ब्रम्ह आहे व हा मायारहीत ब्रम्हमधून आला आहे.त्यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानींना बोलले की,जीव हा ब्रम्ह आहे त्या ब्रम्हमध्ये जाऊ चाहत असाल जेव्हा तो आधी आला तसेच परत तेथे जाईल तर परत खाली तो त्रिगुणीमायेत येईल याच्यात फेरफार म्हणजे अंतर समजू नका ज्ञानींनी आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना उत्तर दिले की,आधी तो ब्रम्ह होता.आता तो जीव आहे आणि ब्रम्हज्ञानाने तो ब्रम्ह सारखा साहेब बनेल आणि साहेब बनल्यावर तो येणार नाही.

साहेब बनेल म्हणजे काय ?

पारब्रम्हमध्ये जीवाचा जीवब्रम्ह स्वभाव होता मायेत आल्यानंतर मायावी स्वभाव बनला. ब्रम्हची भक्ती करेल तर तो मुळ जीवब्रम्ह स्वभाव आणि मायेमध्ये प्राप्त केलेला माया स्वभावापेक्षा वेगळा होणकाळ पारब्रम्ह साहेब स्वभावाचा बनेल जसे मुळब्रम्ह स्वभावाचा जीव गर्भात येतो तसे होणकाळ पारब्रम्ह गर्भात कधी येत नाही याकारणाने साहेब बनल्यावर जीव गर्भात येणार नाही अशी ब्रम्हज्ञानींची समज आहे आदि सतगुरु

सुखरामजी महाराजांनी ब्रम्हज्ञानीला सांगितले तो होणकाळ ब्रम्हसारखा साहेब ही बनून गेला तर त्याच जागेवर जाईल जेथून आधीपासून येण्याची रीत आहे याकरीता हे ब्रम्ह ज्ञानींनो तुम्ही आद घरात पोहचून जाणार परंतु आधीच्या घरुन आधीपासूनच येण्याची रीत आहे.तर आता परत तेथेच जाण्याने तो कसा येणार नाही.तो जरुर येईल.तेथून ब्रम्ह बना किंवा साहेब बना त्रिगुणी मायेत येण्याची रीत आहे.याकारणाने तो त्रिगुणी मायेत येईल.तेथे गेल्यावर काही दिवसाकरीता तेथे राहील जोपर्यंत तेथे राहील तो पर्यंत काळ खाणार नाही परंतु येथे त्रिगुणी मायेत गर्भात येताच त्याला काळ वेळे नुसार खाईल.असे काळाचे भय त्याला आहे मग तो निर्भय कसा झाला?ते सांगा. ।।२।।

ब्रम्ह अस्थिर कन स्थिर सदा ।। सुण ग्यानी क्हे मोय ।।
कर्णे हारो ब्रम्ह हे ।। कन माया क्हुं तोय ।।
कन माया कहुं तोय ।। अर्थ ओ सोझ बतावो ।।
के तज सब ही ग्यान ।। श्रण मेरी चल आवो ।।
सुखराम क्हे इण भेद बिन ।। मोख न पावे कोय ।।
ब्रम्ह अस्थिर कन थिर सदा ।। सुण ग्यानी क्हे मोय ।।३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी ज्ञानींना विचारले की,हे ब्रम्हज्ञानी ब्रम्ह सदा स्थिर आहे की अस्थिर आहे?करणारा ब्रम्ह आहे की माया हे ज्ञान शोधून सांगा.हे ज्ञान तुमच्या समज मध्ये येत नसेल तर जे तुमच्या जवळ ज्ञानाचे आधार आहेत ते त्यागून द्या आणि माझ्या कैवल्य ज्ञानाच्या शरणात या ब्रम्ह नेहमी स्थिर आहे किंवा नेहमी अस्थिर आहे हा भेद जोपर्यंत तुम्हाला समजणार नाही तोपर्यंत मोक्ष प्राप्त होणार नाही. ।।३।।

ब्रम्ह अखंडत थिर सदा ।। माया आवे जाय ।।
कर्णे हारो ब्रम्ह ही ।। और न दूजो माय ।।
और न दूजो माय ।। अरथ सुण ज्याँ ओ होई ।।
जे कसर या माहे ।। फेर कर कहिये मोई ।।
ग्यानी जन सुखदेव कूं ।। कही उलट कऊं आय ।।
ब्रम्ह अखंडत स्थिर सदा ।। माया आवे जाय ।।४।।

ब्रम्ह अखंड्ति आहे,सदा आहे आणि स्थिर आहे.माया येते जाते.ब्रम्ह अखंड्ति,सदा स्थिर आहे तरी ही करणहार(करणारा)ब्रम्हच आहे ब्रम्हशिवाय करणारा दुसरा कोणी नाही असे उत्तर ज्ञानींनी आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना दिले तेव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी ज्ञानींना सांगितले की,ब्रम्ह स्थिर आहे तरी ही करणारा आहे असे तुम्ही म्हणतात तर तो करणारा म्हणजे कर्ता बनला ही कसर त्याच्यात आहे किंवा

नाही हे मला शोधून विचार करुन सांगा. ।।४।।

क्रता कहो स्थिर किम हुवे ।। नाभी कर्णे हार ।।
ओ किम लागे अर्थ रे ।। चौड़े कहे पुकार ।।
चौड़े केहे पुकार ।। अचळ सो ही जग माही ।।
ना क्रता ना केण ।। नाहे आवे कहुँ जाई ।।
सुखराम केहे ग्यानी सुणो ।। समझर करो बिचार ।।
कर्ता थिर क्हो किम हुवे ।। नावी कर्णे हार ।।५।।

अरे,पारब्रम्हचे ब्रम्ह ज्ञानींनो जो कर्ता आहे,ज्याचे नावच कर्ता आहे तो स्थिर आहे हे ज्ञानाच्या समजमध्ये अर्थ कसा बसेल हे समजेल असे चौडा म्हणजे साफ साफ मोकळे करुन सांगा अरे ज्ञानींनो,जो अकर्ता आहे तो अचल राहतो तो काही करीत नाही व तो कोठे येत जात नाही ही समज तर सर्व जगत,ज्ञानी,ध्यानी जाणतात परंतु जो कर्ता आहे कर्णहार आहे तो अचल आहे काही करीत नाही,कोठे येत नाही व कोठे जात नाही हा खरा कसा आहे हे समजून विचार करुन बोला. ।।५।।

माया सोई क्रतार हे ।। माया आवे जाय ।।
माया माही जीते हारसी ।। माया धापे खाय ।।
माया धापे खाय ।। ब्रम्ह तो ने:चळ होई ।।
आनंद लेसो जाय ।। जीव माया कहुं तोई ।।
सुखराम कहे सब सांभळो ।। माया करे ऊपाय ।।
माया सो कर्तार हे ।। माया आवे जाय ।।६।।

ज्याला तु ब्रम्ह समजून उत्पत्ती कर्तार म्हणतो तो ब्रम्ह नाही. माया आहे ती येते आणि ती जाते ती मायाच जिंकते आणि ती मायाच मरते ती मायाच धापते आणि ती मायाच खाते ब्रम्ह तु ज्याला ब्रम्ह समजतो तशी उत्पत्ती करीत नाही.ब्रम्ह तु त्याला ब्रम्ह समजला तसा कोठे येत नाही,कोठे जात नाही कधी जिंकत नाही,कधी हारत नाही,कधी खात नाही,कधी धापत नाही,तो सदा निश्चल,अखंडित राहतो मायेचा आनंद घेतो तो जीव ही माया आहे हे तुला सांगतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ब्रम्हज्ञानींना सांगतात की,तुम्ही सर्व लक्ष देऊन ऐका मायेचे उपाय करते ती सर्व मायाच आहे ब्रम्ह नाही.जन्म घेते ती ही मायाच आहे. मरते ती ही मायाच आहे सृष्टी उत्पत्ती करते ती ही मायाच आहे हे काही निश्चल ब्रम्ह नाही. ।।६।।

ब्रम्ह ब्रम्ह तम कर रहया ।। ब्रम्ह हुवा क्या होय ।।
ग्यानी ग्यान बिचार के ।। अर्थ बताओ मोय ।।
अरथ बताओ मोय ।। ब्रम्ह मे क्या सुख प्यारा ।।

कहो आणंद किस रीत ।। केम कोई लहे बिचारा ।।
सुखराम कहे कर न्याव रे ।। भिंन भिन्न कर कहो मोय ।।
ब्रम्ह ब्रम्ह तम के रहया ।। ब्रम्ह हुवां क्या होय ।।७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हज्ञानींना विचारत आहे की अरे ज्ञानींनो ब्रम्ह, ब्रम्ह तुम्ही सांगून राहिले आहे,ब्रम्ह झाल्याने काय होईल?ब्रम्ह झाल्याने ब्रम्हमध्ये जाल ज्ञानींनो ज्ञानाचा विचार करुन मला सांगा की त्या ब्रम्हमध्ये काय सुख आहे ज्यामुळे ब्रम्ह तुम्हाला प्रिय वाटत आहे.तेथे आनंद कोणत्या रीतीचा आहे? तेथे गेल्यानंतर जीव कसा आनंद घेतो?हे न्याय करुन भिन्न-भिन्न प्रकारे मला समजवून सांगा. ।।७।।

ब्रम्ह हुवा ज्यां दुख नही ।। ना सुख आणंद माय ।।
सुण ग्यानी म्हे भेद दूं ।। चौड़े दिष्टंग लाय ।।
चौड़े दिष्टंग लाय ।। नार बिन ज्यूं नर होई ।।
बिन बिभे बिन ख्याल ।। ग्यान से न्यारो कोई ।।
सुखराम राजा बिन फोज रे ।। ज्युँ राजा गढ जाय ।।
इऊँ ब्रम्ह हुवा ज्यां दुख नही ।। ना सुख आणंद माय ।।८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी ब्रम्हज्ञानींना सांगितले की,ब्रम्ह बनून ब्रम्हपदात जाल त्या ब्रम्हपदात सुख व दुःख दोन्ही ही नाही मी सर्वांना समजमध्ये येईल असे जगाचे दुष्टांत सांगून तेथे सुख कसे नाही हे तुम्हाला समजवितो. जसे पुरुष एकटा आहे त्याला स्त्री नाही आहे तर अशा एकट्या पुरुषाला संसाराचे काय दुःख आहे मनुष्य घरात आहे परंतु मनुष्याजवळ सुख घेण्याचे वैभव घरात नाही तर वैभवा शिवाय वैभवाच्या खेळाचा आनंद मनुष्य कसे घेईल?जसे राजा गडावर चढून गेला गडावर सोबत फौज नाही आहे तर राजाला फौजेपासून जे सुख मिळत होते ते गडावर चढल्याने सुख नाही मिळून राहीले तर त्याला गडावर फौजेला सांभाळण्याचे दुःख ही पडून राहीले नाही.असा जीवब्रम्ह झाल्यावर जीवाला ब्रम्ह मध्ये सुख आनंद ही नाही तर दुःख ही नाही. ।।८।।

नारी बिन नर क्या करे ।। नर बिन नारी जोय ।।
इऊँ माया बिन ब्रम्ह हे ।। सुण ग्यानी कहुं तोय ।।
सुण ग्यानी कहुं तोय ।। अकळ बिन काम कहावे ।।
बिन आवध रजपूत ।। राड़ बिन रणमे जावे ।।
सुखराम कहे यूं ब्रम्ह होय ।। क्या करसी कहुँ तोय ।।
नारी बिन नर क्या करे ।। नर बिन नारी जोय ।।९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हज्ञानींना जगाचा दृष्टांत देऊन सांगत आहे की, जसे स्त्री पुरुषा शिवाय सुख घेऊ शकत नाही तसेच पुरुष स्त्री शिवाय सुख घेऊ शकत नाही अशाप्रकारे जे ब्रम्ह बनून गेले आणि ब्रम्हमध्ये पोहचून गेले तेथे माया नाही तर तेथे पोहचूनही सर्व माया नसल्या कारणाने ब्रम्हमध्ये सुख घेऊ शकत नाही आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानींना सांगतात की,राजपूता जवळ शस्त्र ही नाही असा राजपुत रणात लढाईचे सुख घेण्यास जातो तेथे त्याला काय सुख मिळेल?हे मो बिना अकलेचे काम आहे म्हणजे मुर्ख विचाराचे काम आहे जसे राजपूत बिना शस्त्राने लढाई नसतांना रणात जाऊन सुखाच्या चाहणेत जातो तसेच जीव होणकाळ ब्रम्हमध्ये सुखाच्या इच्छेने जातो परंतु तेथे सुख देणारी मायाच नाही तर तेथे जीवाला सुख मिळेल का?जर सुखच मिळाले नाही तर जीवाला ब्रम्हज्ञान प्रगट करवून ब्रम्हमध्ये पोहचविणे हे बिना अकलेचे काम नाही तर काय?।।९।।

बिन उधम जो सुख हुवे ।। तो नर करे न कोय ।।
कोण भोळो संसार मे ।। नर नारी सब लोय ।।
नर नारी सब लोय ।। ब्रम्ह इंऊं खेल बणाये ।।
बिन माया सुख नहि ।। संग रमणे तब आयो ।।
सुखराम कहे नर समज रे ।। सब कुछ कीया होय ।।
बिन उधम जो सुख हुवे ।। तो नर करे न कोय ।।१०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सर्व स्त्री-पुरुषांना सांगितले की,विना उद्योग केल्याने सुख मिळाले असते तर कोणी ही पुरुष उद्योग करणार नाही आणि सुखाचा आनंद घेईल असा भोळा स्त्री पुरुष व जगाच्या लोकांमध्ये कोण आहे की विना उद्योग सुख होत आहे तरीही त्या सुखाकरीता तो कष्ट करीत आहे विना उद्योग सुख मिळत नाही म्हणून जीवब्रम्हने मायेचा हा खेळ बनविला आणि मायेच्या सोबत पाच सुख घेण्यात रमण्याकरीता आला.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्त्री पुरुषांना समजण्या करीता सांगितले की,हे स्त्री पुरुषांनो सर्व सुख उद्योग केल्यानेच मिळतात विना उद्योग केल्याने मिळत नाही जर विना उद्योग करुन सुख मिळाले असते तर कोणत्या ही पुरुषाने उद्योग केलाच नसता. ।।१०।।

अेक माया आनंद हे ।। दूजो ब्रम्ह बिचार ।।
तीजो पद आनंद हे ।। सतश्रुपी सार ।।
सतसरूपी सार ।। देर दिष्टंग बताऊँ ।।
या तीना को न्याव ।। प्रख न्यारो कर लांऊं ।।
सत्त आनंद बेराग ज्यूं ।। माया सुख ग्रेहे होय ।।

सुखराम इण दोय से ।। इंऊ ब्रम्ह असो जोय ।।११।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्त्री पुरुषांना सांगितले की जीवासाठी आनंद तीन प्रकारचे आहेत.एक आनंद त्रिगुणी मायेचा आहे दुसरा आनंद त्रिगुणीमायेतून निघून म्हणजे काळाच्या दु:खातून निघून ब्रम्ह बनण्याचा आहे व तिसरा आनंद सतस्वरुपाचा आहे मी तुला जगाचे दृष्टांत देऊन सांगतो हे तिन्ही तऱ्हेचे निर्णय पारखून वेगळे करुन आणतो.जसे जगात काही लोक गृहस्थी असतात तर काही वैरागी असतात आणि काही लोक गृहस्थीही राहत नाही आणि वैरागी ही राहत नाही गृहस्थी व्यक्तीला खाणे,पिणे,चांगल्या अंथरुणावर झोपणे असे पाची आत्म्यांचे सुख मिळतात तर वैरागीला ज्ञान सुख मिळते.काही लोक संसार ही करीत नाही आणि वैरागी ही बनत नाही.तर त्यांना ज्ञानाचे ही सुख मिळत नाही परंतु संसाराचे देणे-घेणे,कर भरणे इत्यादी संसाराच्या झंझटीचे दु:ख पडत नाही हे सुख मिळाले अशाच प्रकारे एक जीव मायेचा आनंद घेतो तर सतस्वरुप पोहचलेला जीव विज्ञान ज्ञानाचे सुख घेतो परंतु जो मायापद त्यागून पारब्रम्हमध्ये पोहचला अशा जीवाला मायेचे ही सुख मिळत नाही आणि सतस्वरुपाचे ही विज्ञान सुख मिळत नाही त्याला मायेच्या काळ कष्टातून मुक्त झाला आणि ब्रम्ह बनला असा मायेपासून मुक्त होऊन ब्रम्ह बनण्याचे सुख मिळते. ।।११।।

अेक माया रूपी पद हे ।। दूजो चेतन जाण ।।
तीजो पद सो ब्रम्ह ही ।। सुणो सकळ नर आण ।।
सुणो सकळ नर आण ।। पद चोथो ओ होई ।।
सतसरूप सत्त माहे ।। निसंक निर्भे हुवे कोई ।।
सुखराम कहे सब सांभळो ।। ग्यानी ध्यानी आण ।।
अेक माया रूपी पद हे ।। दूजो चेतन जाण ।।१२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सर्व ब्रम्हज्ञानींना व जगाच्या लोकांना सांगितले की जीवाचे राहण्याचे सर्व चार पद आहेत.

मायारुपी पदात मायेचे सुख आहे परंतु काळाचे भय आहे व हे महाप्रलयात मिटणारे पद आहे असे खोटे पद आहे चेतनचे म्हणजे जीवाचे पद विना सुख दु:खाचे आहे ब्रम्हच्या पदातही सुख आणि दु:ख दोन्ही नाही.चौथे सतस्वरुपाचे पद आहे तेथे फक्त सुखच सुखच आहे तेथे काळ नाही व ते सदा राहणारे पद आहे त्या सतस्वरुपाच्या सतपदामध्ये पोहचणारा संत निर्भय व निशंक बनून राहतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व त्रिगुणीमायेचे ज्ञानी,ध्यानी व ब्रम्हज्ञानी आणि जगाच्या लोकांना जीवाचे राहण्याचे मायापद,चेतनपद,ब्रम्हपद व सतस्वरुप पद असे चार पद आहेत असे सांगून

राहिले आहेत. ।।१२।।

ग्यान सुख आणंद सो ।। ज्यां भ्यासो ज्यांही होय ।।
माया सुख बिन जूझियां ।। कदे न पावे जोय ।।
कदेन पावे जोय ।। पाय फिर दुखिया होई ।।
इंऊं करणी कर जीव ।। पार पहुंचे नही कोई ।।
सुखराम इंद्याँ सुख रे ।। पचियां पावे लोय ।।
ग्यान सुख आणंद तो ।। ज्यां भ्यास्यो त्यांही होय ।।१३।।

वैराग्य ज्ञानाचे सुख ज्याने वैराग्य धारण केले त्यालाच होईल.ते संसारींना नाही भासत संसारींना इंद्रियांचे सुख प्रगट समजतात इंद्रियांचे मेहनतीशिवाय कधी मिळत नाही आणि हे सुख प्राप्त केल्यानंतर जीव परत दु:खी होऊन जातो.इंद्रियांच्या सुखाने जीवाला तृप्त आनंद कधी मिळत नाही अशाच प्रकारे त्रिगुणी मायेचे सुख बिना करणी केल्या मिळत नाही त्याचे सुख झुंझुन करणी केली तरच मिळते आणि जसे करणीने प्राप्त केलेले पुण्य संपून जातात,तसेच जीवाला ८४ लक्ष योनीचे दु:ख पडते जसे १०१ यज्ञ-इंद्र,८४ लक्ष योनी,सत-जप-तप -स्वर्ग,८४लक्ष योनी म्हणजे सत-जत-तप हि खुप मेहनतीने झुंझुन करतात त्याचे फळ स्वर्ग मिळते.परंतु स्वर्गात पुण्यकर्म भोगतात मग पुण्य संपल्यावर ८४,००,००० योनीमध्ये दु:ख भोगतात.सतस्वरुप जीवाने विज्ञान ज्ञानाची सुखाची स्थिती एक वेळा प्राप्त करुन घेतली तर तो परत कधीही कोणत्याही प्रकारच्या दु:खात पडत नाही असे विज्ञानाचे सुख मायेच्या क्रिया करणीने प्रगट होत नाही ते वैराग्य विज्ञान सतस्वरुप सतगुरुने प्रगट केल्यावरच प्रगट होते व ते सुख ज्याने प्रगट केले त्यालाच प्रगट रुपात समजते दुसऱ्यांना नाही समजत. ।।१३।।

बे इंद्याँ को सुख रे ।। हट बिन लियो न जाय ।।
तीना को सुख स्हेजमे ।। लेत सरब हंस आय ।।
लेत सरब हंस आय ।। पाय फिर दुखिया होई ।।
अर भ्यास्यां सुण ग्यान ।। ताहे मे दुखन कोई ।।
ओ दिष्टांग सुखराम के ।। सब नर सुणियो आय ।।
बे इंद्याँ को सुख रे ।। हट बिन लियो न जाय ।।१४।।

कान,डोळे व नाक या तिन्ही इंद्रियांचे सुख सहजात मिळतात परंतु जीभ व लींग हे दोन इंद्रियांचे सुख कष्ट केल्याशिवाय मिळत नाही आणि सुख घेऊन पुन्हा दु:खी होऊन जातात.असे दु:ख ज्याला वेदाचे वैराग्य ज्ञान भासले आहे त्याला होत नाही अशाचप्रकारे जीवाला करण्या करुन मायेचे सुख मिळतात ते सुख नेहमी करीता टिकत नाही असे करण्यांचे सुख संपले की परत काळाचे दु:ख पडतात परंतु ज्याला

सतस्वरुप विज्ञान ज्ञान भासले त्याला सुखच सुख मिळते त्याच्यावर काळाचे दु:ख परत कधी पडत नाही.।।१४।।

दळ बादळ भेळा किया ।। मुलक दाबियो जाय ।।
क्या पाई वां चीज रे ।। इधक जग के माय ।।
इधकी जग के माय ।। रेत वाही सुण होई ।।
क्या इधकी क्या कम ।। रेस न्यारी नही कोई ।।
इंऊ क्रणी सुखराम क्हे ।। सब ही अेक कहाया ।।
दळ बादळ भेळा किया ।। मुलक दाबियो जाय ।।१५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या लोकांना सांगतात जसे राजाने फौज फाटा जमा केला आणि युध्द करुन परमुलूक ताब्यात करुन घेतले त्या राजाजवळ आधी आपले राज्य होते.आपल्या राज्यात जशी प्रजा होती तशीच प्रजा नवा मुलूक ताब्यात घेतला त्याच्यात मिळाली.राजाला परकीय मुलूक ताब्यात करण्याकरीता दलबादल जमा करावे लागले,लढावे लागले,लढून पर मुलकाचा ताबा मिळाला.याच्यात नवीन गोष्ट काय मिळाली?जी प्रजा आधी जवळ होती तशीच प्रजा परमुलाकापासून मिळाली ती प्रजा कमी होती किंवा जास्त होती फरक इतकाच होता नव्या प्रजेला प्राप्त केल्याने त्याच्या राज–सुखाच्या प्रकृतीमध्ये जराही फरक पडला नाही अशाच प्रकारे कमी झुंजुन कमी करणी करा किंवा खुप झुंझुन नव्या नव्या अनेक करण्या करा सर्वांपासून पाच विषयांचेच सुख मिळतील सतस्वरुप विज्ञान ज्ञान सुख या करण्यांनी मिळणारा नाही. ।।१५।।

अमर जड़ी बिन बाहेरी ।। सब ही जड़ीया अेक ।।
जांसूं जावे रोग रे ।। अमर न हुवे देख ।।
अमर न हुवे देख ।। सकळ क्रणी इंऊ भाई ।।
ब्रम्ह लग सो जाय ।। मोख पहुंचे नही काई ।।
ध्यान भजन सुखराम क्हे ।। लिव लग काची देख ।।
अमर जड़ी बिन बाहेरी ।। सब ही जड़ी या अेक ।।१६।।

जगात अनेक जड्या आहेत त्याच्यात एक अमर जडी ही असते त्या जड्यांमधून अमर जडी काढून टाकली तर बाकी राहलेल्या सर्व जड्या एकच स्वभावाच्या आहेत.या जड्यांनी रोग जाईल परंतु अमरजडीने जसे अमर होता येते तसे अमर होता येत नाही अशाचप्रकारे माया आणि ब्रम्हच्या करण्यांनी त्रिगुणीपदापासून तर होणकाळ ब्रम्ह पदापर्यंत पोहचतो. येथ पर्यंत की कर्तारब्रम्ह ही करुन देईल परंतु सतस्वरुपाच्या मोक्षपदात नाही पोहचणार याकरीता पारब्रम्हपर्यंतचे ध्यान,भजन,लीव हे कच्चे आहे,हे

सतस्वरुपाच्या वैराग्य विधी सारखे नेहमी काळाच्या दुःखातून मुक्त करविणारा तसेच महासुख देणारा पक्का नाही. ।।१६।।

सरब किसब न्यारा करे ।। अन्न सकळ ले आण ।।
इंऊ क्रणी सिंवरण ध्यान लग ।। पूर्ण ब्रम्ह पिछाण ।।
पूरण ब्रम्ह पिछाण ।। अन्न सूं खुद्या जावे ।।
सुण फिर लागे भूक ।। ब्रम्ह होय इंऊ ग्रभ आवे ।।
सुखराम उपायां भजन लग ।। सब अेकी कर जाण ।।
सर्ब किसब न्यारा करे ।। अन्न एक ले आण ।।१७।।

जसे सर्व लोक वेग–वेगळे धंदे करतात आणि त्यापासून धन कमवून धान्य घरी आणतात ते धान्य भूक लागल्यावर खातात खाल्ल्याने खाणाऱ्याची भूक मिटून जाते परंतु भुक सदाकरीता मिटत नाही अशाचप्रकारे पारब्रम्हपर्यंत पोहचविणाऱ्या करण्या, स्मरण,ध्यान,लीव आहे हे समज या पारब्रम्ह पर्यंतच्या करण्या,स्मरण,ध्यान,लीवच्या उपायांनी जीव मायेला त्यागून मायेच्या पलिकडे पारब्रम्हमध्ये पोहचून ब्रम्ह ही बनून जातो तेथे जीव काळाच्या दुःखातून मुक्त होतो परंतु तेथे त्याला सुख मिळत नाही तेथे त्याला सुखाची भुक लागते सुखाच्या भुकेमुळे जीव ब्रम्हपद त्यागून देतो आणि गर्भात येऊन जीवपणा धारण करतो आणि मायेसोबत दुःख भोगतो म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व संतांना सांगतात की,पारब्रम्ह पर्यंतच्या सर्व करण्या, स्मरण,ध्यान,लिव चे जितके उपाय आहे ते सर्व उपाय गर्भात येऊन काळाचे दुःख भोगण्याचे एकाच प्रकारचे आहे याच्यात गर्भातून निघून काळापासून मुक्त होण्याचा उपाय नाही हे जाणा. ।।१७।।

प्रम हंस नर होय कर ।। सिंवरे सिरजण हार ।।
सो ग्रस्ती सो बार रे ।। संता करो बिचार ।।
संता करो बिचार ।। कर्म तो क्रता माही ।।
निराकार निरबाण ।। सरब ओपत जांही ।।
सुखराम सबे पेदा किया ।। वो पक्को घर बार ।।
प्रम हंस नर होय कर ।। सिंवरे सिरजन हार ।।१८।।

कोणी मनुष्य आपले कुळ,पत्नी सोडून परमहंस बनतो आणि सिरजनहार होणकाळ पारब्रम्हला त्रिगुणी मायेपासून मुक्त असा वैरागी समजून त्याची भक्ती करतो असे गृहस्थी जीवन त्यागलेल्या परमहंसाला आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अरे परमहंस,तु त्रिगुणी माया त्यागण्याकरीता गृहस्थी जीवन त्यागले परंतु तु ज्याची भक्ती करतो तो जगाच्या सर्व गृहस्थी स्त्री–पुरुषांपेक्षा शंभर गुण गृहस्थ आहे

तोच तर सर्व सृष्टीचा कर्ता आहे याच्यातच इच्छेसोबत गृहस्थी कर्म करण्याची वासना आहे यानेच निराकार,निर्वाण शिवब्रम्ह,चिदानंदब्रम्ह,३ ब्रम्हचे १३ लोक आणि आकार म्हणजे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व ३ लोक १४ भवन व ४ पुऱ्या,सर्व स्त्री–पुरुष पैदा केले आहे असा हा तुझ्या माझ्या पेक्षा शंभर गुणा पक्का गृहस्थी आहे आदि सतगुरु सुखरामजी महाराज परमहंसाला सांगतात की त्रिगुणी माया त्यागण्याकरीता कुटूंब परिवार ही स्थुल माया त्यागावी लागत नाही ही माया उलट त्रिगुणीमाया त्यागायला मदत करते.त्रिगुणी माया त्यागण्याकरीता त्रिगुणी माया इच्छा व त्रिगुणीमायेत रचमचलेला सिरजनहार त्यागावा लागतो.हंसाची त्रिगुणी माया त्याचे मन आणि पाच आत्मा ड्किती.हंसाचे मन व ५ आत्मा हंसापासून निघून गेले की त्रिगुणीमाया स्वता:हून सुटून जाते.हे मन व ५ आत्मा त्रिगुणी मायेशी म्हणजे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती पासून निघत नाही.म्हणून परमहंस तु सिरजनहार अटल पुरुष आहे,त्रिगुणी मायेहून वेगळा आहे,वैरागी आहे समजून भक्ती करतो सिरजनहार अटल आहे परंतु तो स्वत: गृहस्थी आहे आणि त्रिगुणी मायेच्या वश आहे आणि त्या त्रिगुणी मायेमध्ये पूर्णपणे अटकला आहे असा सिरजनहार तुझी त्रिगुणी माया कशी काढेल?जो सिरजनहारचा सिरजनहार आहे असा सतस्वरुप सतगुरु जो विज्ञानी वैरागी आहे,जो गृहस्थी नाही व मन आणि ५ आत्मा या मायेपेक्षा वेगळा आहे अशा सतस्वरुप सतगुरुचे स्मरण कर तो पक्का वैरागी आहे,त्याच्या आत त्रिगुणी मायाचे कोणत्या प्रकारचे कर्म नाही व तो त्रिगुणी मायेच्या पूर्णत: पलिकडे आहे.।।१८।।

**सब माया सूं लग रहया ।। साध सिध अवतार ।।**
**अलख निरंजण आप हे ।। वाहाँ लग माया धार ।।**
**वाहाँ लग माया धार ।। अढळ अेक पुर्ष कहावे ।।**
**वा माया हे असल ।। चाल वाँसू हंस आवे ।।**
**सुखराम हद बेहद लग ।। बेहे माया की धार ।।**
**सब माया सूं लग रहया ।। साध सिध औतार ।।१९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या लोकांना सांगत आहे की जगाचे सर्व साधु, सिध्द,अवतार हे सर्व मायेच्या धारेत वाहून राहिले आहे.अलख जो लखण्यात येत नाही.निरंजन जो इंद्रिय रहित आहे अशा होणकाळ पारब्रम्हपासूनच मायेची धार वाहून राहिली आहे हा होणकाळ पारब्रम्ह अटळ पुरुष नक्की आहे परंतु हा योगी नाही हिच खरी माया आहे हाच त्रिगुणी मायेसोबत भोग करतो.याच्या भोगानेच हंस पारब्रम्ह पदातून उतरुन खाली साकारी मायेच्या पदात येतात म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानींना सांगतात की हद म्हणजे त्रिगुणी मायेपर्यंत आणि बेहद

म्हणजे पारब्रम्ह पर्यंत मायेचीच धार वाहून राहिली आहे म्हणजे सर्व साधु,सिध्द आणि अवतार मायेतच अटकले आहेत,मायेच्या पलिकडे नाही पोहचले आहे.।।१९।।

सतश्रुप तो ब्रम्ह नही ।। नही साहेब नही जीव ।।
ना कोई पुर्ष नार हे ।। ना कुछ यार न पीव ।।
ना कुछ यार न पीव ।। सुणो ग्यानी जग सारा ।।
सतश्रुप ज्यूं चीज ।। इसो पद अमर बिचारा ।।
सुखराम क्हे आणंद हे ।। नही धीणो नही धीव ।।
सतसरूप तो ब्रम्ह नही ।। नही साहेब नही जीव ।।२०।।

सतस्वरुप हा होणकाळ पारब्रम्ह सारखा ब्रम्ह,जीवब्रम्ह सारखा चेतन,मन व ५ आत्मा सारखा माया,इच्छेसारखा त्रिगुणीमाया,संसाराच्या देहा सारखा साकारी माया नाही आहे. तो सृष्टीची निर्मिती करणाऱ्या साहेबाच्या स्वभावाचा नाही तो सुख चाहणारा आणि मायेत पडून काळाचे दुःख भोगणाऱ्या जीवाच्या स्वभावाचा नाही. तो मनाच्या विकारी स्वभावाचा नाही आणि शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या पाची आत्म्यांच्या विकारी स्वभावाचा नाही व त्रिगुणी मायेच्या तीन गुणांच्या विकारी स्वभावाचा नाही तो सतस्वरुप पुरुष ही नाही तो या सर्वांपेक्षा न्यारा आहे नेहमी राहणारा आहे त्याचे स्वरुप सत्य आहे त्याच्या स्वरुपात असत्य माया कोठे ही नाही,तो विज्ञान वैरागी आहे.तो अमर आहे त्याचे पद अमर आहे तेथे आनंदच आनंद आहे त्याच्या पदात काळाचे दुःख थोडेही कोठे नाही तेथे पोहचणारे सर्व अमर आहेत सर्व नेहमी राहणारे आहे तेथे पोहचलेल्या हंसांना नेहमी आनंद मिळत असतो.त्या आनंदात पोहचलेल्या संताला मायेमध्ये जसे पचावे लागते तसे पचावे लागत नाही ह्या मायेत कसे पचावे लागते याचे आदि सतगुरु सुखरामजी महाराजानी जगाचा दुध ,तुपाचा दाखला दिला जसे गाय दुध देते,त्या दुधाचे दही,तुप बनते त्या दुधा,तुपाचा जग आनंद घेतो काही वेळेनंतर(दिवसांनी)गायीचे दुध देणे बंद होऊन जाते परत दुध निपजेल तोपर्यंत विना दुधा,तुपाचे राहावे लागते.गायीने दुध देणे सुरु केले की दुधा,तुपाचे सुख परत मिळणे चालू होते जसे गायीच्या दुधा,तुपाचा आनंद घ्यायचा आहे तर गायीपासून दुध काढायला व दुधापासून तुप बनवायला पचावे लागते असे मायेपासून सुखांकरीता पचावे लागते मायेपासून नेहमी सुख मिळत नाही खंडीत सुख मिळतात म्हणून मायेशी लिव,भजन,ध्यान अशा क्रिया करतच राहाव्या लागतात सतस्वरुपात हे क्रिया कर्म काही करावे लागत नाही तेथे पोहचले की नेहमी आनंदच आनंद मिळतो असे हे नेहमी राहणारे अमरपद आहे.।।२०।।

।। कुंडल्या ।।

ब्रम्ह ग्यान मत धार के ।। कहा इधक कोई होय ।।
ओतो हे ज्युं बण रहयो ।। जाण मा जाणो कोय ।।
जाण मा जाणो कोय ।। इधक ओछो नही होई ।।
जेसे रवि प्रकास ।। मंड सारी पर लोई ।।
बस्त बणी ज्यां बण रही ।। जाण्या सूं क्या होय ।।
यूं ब्रम्ह ग्यान सुखराम के ।। धार इधक नही कोय ।।२१।।

जीव हा ब्रम्ह मन आहे जीव हा आधी ही ब्रम्ह होता आज ही ब्रम्ह आहे तसेच पुढे ही ब्रम्ह राहील ब्रम्हज्ञानाचे मत धारण करुन जीव ब्रम्ह कसा आहे हे समजल्याने जीवाच्या ब्रम्हमध्ये काही फरक पडणार नाही हे जाणा किंवा जाणू नका याच्याने त्याच्यात आधीपासून अधिकपणा येणार नाही किंवा कमीपणा येणार नाही जसे-सूर्याचा प्रकाश सर्व सृष्टीमध्ये आहे त्याला जाणल्याने जास्त प्रकाश होईल आणि नाही जाणल्याने कमी प्रकाश होईल असे कधी होणार नाही त्याला जाणा अथवा न जाणा सूर्याच्या प्रकाशात काही फरक पडणार नाही तो तर जसा बनला आहे तसाच बनलेला आहे तशीच शेवट पर्यंत बनलेली राहील जाणल्याने अथवा न जाणल्याने त्याच्यात कमी-जास्त होणार नाही. ।।२१।।

को क्रणी की बात ।। ताय लेणे दे धारी ।।
सुभ असुभ सो खोल ।। छांट के क्हो बिचारी ।।
छांट के कहो बिचारी ।। ताहे लेणे ओ आयो ।।
ओतो आपो आप ।। कांय ओ जीव कहायो ।।
ओ तूं ग्यान बिचार के ।। बात मानो सुण म्हारी ।।
को कर्णी सुखराम ।। ताहे लेणे देहे धारी ।।२२।।

या जीवब्रम्हने कोणत्या करणी करीता मायेचा देह धारण करणे मान्य केले?कोणत्या करणी करीता तो पाच तत्वाच्या देहात आला?तो शुभ करण्या करायला आला का अशुभ करण्या करायला आला?हे खोलून-खोलून छाटून-छाटून मला सांगा शुभ करणीने त्याला स्वर्गादिकात पाच इंद्रियांचे मनोवाछिंत सुख मिळतात हे तर ठीक आहे परंतु नरकात पडून अनंत दु:ख भोगावे लागते हे का मान्य केले?हा तर स्वत: ब्रम्ह होता ब्रम्हला कर्म लागत नाही तर याच्या उरात काय होते की त्याला मायावी जीव बनण्याची इच्छा झाली?हे समजायचे आहे तो ब्रम्ह कसा आहे हे समजल्याने तुझे काम होणार नाही.त्याला मायावी देह धारण केल्यावर सुखासोबत दु:ख मिळतील हे समजत असुनही त्याने ब्रम्हपासून जीव होणे पसंत केले याचा ज्ञानी तु विचार कर ही माझी गोष्ट समज त्याला कोणते सुख पाहिजे होते ज्याच्याकरीता त्याने नरकाचे दु:ख

भोगणे ही पसंत केले.याकरीता ब्रम्ह बनुन ब्रम्हमध्ये पोहचण्यापेक्षा काळाच्या दु:खातुन मुक्त असे जे सुख पाहिजे ते त्याला कसे मिळतील? ते शोध. ।।२२।।

ब्रम्ह ग्यान बिन ऊपने ।। ऊंच नीच संग जाय ।।
सो नर सब पिस्तावसी ।। अंत काळ के मांय ।।
अंत काळ के माय ।। मार पडसी सिर भारी ।।
यां तीना की मरजाद ।। भांग के करी खुवारी ।।
पाप ध्रम की बास्ना ।। रेती हे उर माय ।।
जब लग  झूटो कथत हे ।। ब्रम्ह ग्यान कूं आय ।।२३।।

जीवाला नेहमीपासून सुख पाहिजे म्हणून त्याने ब्रम्हपद सोडले आणि त्रिगुणीमायेच्या पदात आला.त्रिगुणी मायेमध्ये ब्रम्हा,विष्णु,महादेव यांचे त्रिगुणांचे नियम चालतात त्यांनी निच उंच कर्माचे नियम बनविले आहे उंच कर्म केल्याने पुण्य होते आणि निचकर्म कर्म केल्यावर पाप लागते असे नियम बनविले.उचकर्म करणाऱ्याला स्वर्गादिक दिले जाते, तर निचकर्म करणाऱ्याला नर्कादिक दिले जाते जीव हा आधीपासून होणकाळ ब्रम्हपदात राहत होता तेथे तो ब्रम्ह होता म्हणून त्यावेळेस त्याला ब्रम्हज्ञान होते तेथे तो मायावी नव्हता. मायेच्या देशात येऊन मायावी बनुन गेला आधी जसा ब्रम्ह होता तसा ब्रम्ह राहण्याचे त्याच्या जवळचे कुद्रती ब्रम्हज्ञान मायावी देशात जन्म घेतल्यानंतर नष्ट होऊन गेले तसेच मायेत पडल्यानंतर तसे ब्रम्हज्ञान त्याने प्राप्त ही केले नाही तसेच त्याच्या हृदयात पाप आणि पुण्याची वासना ही राहून राहीली आहे.तरी ही मी ब्रम्ह आहे आणि ब्रम्हला कर्म लागत नाही असे खोटा ब्रम्हज्ञानी मनानेच बनुन निचकर्म करु लागतो खोटा मनानेच ब्रम्हज्ञानी समजल्याने त्याला कर्म लागणार नाही असे नाही होणार तो उंच लोकांचा संग करुन उच कर्म करेल तर त्याला पुण्य लागतील आणि तो निच लोकांचा संग करुन निचकर्म करेल तर त्याला पाप लागेल असा खोटाच ब्रम्हज्ञानी आहे विचार करुन ब्रम्हच्या नावावर निचकर्म केल्याने ब्रम्हा,विष्णु, महादेवच्या नियमांचे उल्लंघन होईल तो खरा ब्रम्हज्ञानी असता तर खरच त्याला कर्म लागले नसते आणि ब्रम्हा,विष्णु,महादेवच्या नियमांचे उल्लंघन झाले नसते.जीव ब्रम्हज्ञानी नसल्यामुळे ब्रम्हा,विष्णु,महादेवचे नियम तोडले गेले.आता ते नियम तोडल्यावर अंतकाळी यम त्याला नरकात टाकतील तसेच काळाचे वाईट तऱ्हेने त्याच्या शिरावर मार पडेल तेव्हा तो हंस ब्रम्हज्ञानाच्या नावावर निचकर्म केले याकरीता पश्चाताप करेल म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज खोट्या ब्रम्हज्ञानींना सांगतात की,ब्रम्हज्ञान उत्पन्न न होता ही ब्रम्ह ज्ञान झाले असा खोटा आधार घेऊन ब्रम्हा,विष्णु,महादेवची मर्यादा भंग करुन निचकर्म कराल तर नरकाचे महादु:ख पडतील अशी खराब होईल. ।।२३।।

ब्रम्ह ग्यान तब साच ।। बिष इम्रत सम जाणे ।।
बेटी माता बेन ।। नार सागे कर माणे ।।
लेवे सबे सवाद ।। फेर धणियापे नाही ।।
सुभ असुभ की चाय ।। आस मासो कुछ नाही ।।
जीवण मरण अेको गिणे ।। जस कुजस नही कोय ।।
ब्रम्ह ग्यान सुखराम के ।। वां के उर घट होय ।।२४।।

ब्रम्हज्ञानी खोटा कसे ओळखावे हे खऱ्या ब्रम्हज्ञानीचे गुण वर्णन करुन आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जगाला समजावले आहे. खऱ्या ब्रम्हज्ञानीला विष हि मारणारी माया व अमृत ही तारणारी माया हे दिसत नाही त्याला विष व अमृत हे सारखे दिसते. त्याला मुलगी,आई,पत्नी,बहिण हे वेगवेगळे दिसत नाही त्याला हे सर्व ब्रम्ह आहे आणि मी पण ब्रम्ह आहे असे सर्व एकसारखे दिसतात याकारणाने तो सर्वांसोबत सर्व भोग करतो परंतु कोणावरही जसे मायेमध्ये पुरुष स्त्रीवर पत्नीचा अधिकार,बहिणी वर भावाचा अधिकार,आईवर मुलाचा अधिकार व मुलीवर बापाचा अधिकार ठेवतो तसा अधिकार तो ब्रम्हज्ञानी ठेवत नाही त्याच्यात शुभ म्हणजे चांगल्या कर्मांनी सुख मिळतील व अशुभ म्हणजे निच कर्मांनी दु:ख पडतील ही विषमता राहत नाही.त्याला सुख दु:ख एक सारखे दिसते म्हणून त्याच्यात शुभ कर्म करुन व अशुभ कर्म टाकून सुख प्राप्त करण्याची इच्छा मासाभर ही राहत नाही तो ब्रम्हज्ञानी मरण व जिवंत राहणे एकसारखे समजतो मेला तरी मी ब्रम्ह आहे व जिवंत आहे तरी मी ब्रम्ह आहे असे एकसारखे समजतो.तो ब्रम्हज्ञानी यश तसेच अपयशाला मानत नाही म्हणजे यश आले तर सुख पडतील व अपयश आले तर दु:ख पडणार असे मानत नाही.त्याला सुख व दु:ख वेगवेगळे दिसत नाही.याकरीता यश व अपयश ही वेगवेगळे दिसत नाही असे ज्या हंसाच्या उरात ज्ञान प्रगट झालेले असते तो खरा ब्रम्हज्ञानी आहे या ज्ञानाच्या गुणांमध्ये जे बसत नाही परंतु स्वत:ला ब्रम्हज्ञानी म्हणतो तो खोटा ब्रम्हज्ञानी आहे. असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री-पुरुषांना सांगत आहेत. ।।२४।।

करे जात मे ब्यांव ।। बेन बेटी प्रणावे ।।
डसे सर्प तब आय ।। सोच चित्त माही लावे ।।
तब लग झूटो कथत हे ।। मुख सूं ब्रम्ह ग्यान ।।
आप जात मे फस रहयो ।। देहे ओर कूं आन ।।२५।।

जोपर्यंत आपल्या जातील लग्न करुन राहीला आहे आणि बहिण व मुलीचे ही लग्न आपल्या जातीतच करतो आणि सापाने येऊन चावून घेतले तर मनात चिंता करतो

तो खोटा आहे कारण की स्वत: तर जातीत फसून राहीला आणि दुसऱ्यांना ब्रम्हज्ञान सांगून राहीला आहे. ।।२५।।

।। कुंडल्या ।।

**बाळक ब्रम्ह सरूप हे ।। भर जोबन मे जीव ।।**
**जब बिग्यान प्रकासियो ।। जब स्मर्थ क्हे सीव ।।**
**तब समरथ कहे सीव ।। दसा तीनु इण पाई ।।**
**किसी अधिक या माहे ।। सोझ कहिये मुज भाई ।।**
**सुखराम क्हे पद तीन अे ।। लेणे हार ओ जीव ।।**
**बाळक ब्रम्ह सरूप हे ।। भर जोबन मे जीव ।।२६।।**

जसे जीव ब्रम्हज्ञानाने ब्रम्हाच्या स्वभावासारखा राहतो तसेच्या तसे बालक अवस्थेत जीव विना ज्ञानाने ब्रम्हाच्या स्वभावा सारखा राहतो त्याला विष–अमृत,आपला–परका असे काही दिसत नाही तो जेव्हा पूर्ण जवान होऊन जातो तेव्हा तोच जीव जीवा सारखा म्हणजे मायेच्या पूर्ण वासनिक स्वभावाचा बनून जातो.तेव्हा त्याला त्याचे परके,विष–अमृत,बहिण–मुलगी,आई–पत्नी,नफा–तोटा ह्या सर्व मायावी वस्तु वेगवेगळ्या दिसतात. त्याला विज्ञान ज्ञान प्रकाश झाला तर तो संसारापासून हटून विज्ञानी बनून जातो जसे जीवाने एकाच शरीराने बालकाची दशा प्राप्त केली म्हणजे विना ब्रम्हज्ञानाने ब्रम्हची दशा प्राप्त केली आणि जवान(युवा)झाला तेव्हा जीवाने जीवाची दशा प्राप्त केली व होणकाळी ब्रम्हचे विज्ञान घटात प्राप्त केले.म्हणजे तिन्ही दशा संसारी मायेची,जीव ब्रम्हची व होणकाळी समर्थ पारब्रम्ह साहेबाची दशा एकाच हंसाने प्राप्त केली.या तिन्ही दशांमध्ये पाच आत्म्यांचे सुख घेऊन होणकाळी विज्ञानापर्यंत मायेचे सुख मिळाले. म्हणजे कुळाचे म्हणजे माया मातेचे आणि ब्रम्ह पित्याचे सुख मिळाले याच्यात नवे काय मिळाले?जो ब्रम्ह मायेसाठी कुळ कुटूंबाहून वेगळा आहे म्हणजे मायेची भक्ती करुन आणि ब्रम्हज्ञानी बनून आजपर्यंत माया व होणकाळ ब्रम्हचे सुख घेऊन राहिले होते आणि आज ही तेच मिळाले नवे सुख काय मिळाले?म्हणजे ब्रम्ह बनला तर तो ही मायेतच आहे.जीव बनला तर तो ही मायेतच आहे समर्थ शिव बनला तर तो ही मायेतच आहे मायेच्या पलिकडे वैरागी नाही संसार रुप आहे,ज्ञानरुप नाही जन्म–मरणाच्या पलिकडे म्हणजे जन्म–मरणात न येणारा ज्ञानरुप नाही. ।।२६।।

**गुरू पद न्यारो सत्त हे ।। ज्यूं अमर फळ होय ।।**
**ओर राम लग भक्ति सो ।। अन्न जळ जड़ियां जोय ।।**
**अन जळ जड़िया जोई ।। सर्ब सुख ज्हाँ जावें ।।**
**यूं कर्णी रट राम ।। मुक्त लग जन फळ खावे ।।**

सुखराम उपाया अेक सो ।। ना ना बिध की जोय ।।
गुरू पद न्यारो सत्त हे ।। ज्यूं अमर फळ होय ।।२७।।

गुरुपद कुळपदापेक्षा वेगळे आहे म्हणजे त्रिगुणी माया माता पद आणि होणकाळ पारब्रम्ह पिता पदाहून वेगळा आहे तो काल ही होता,आज ही आहे आणि उद्या ही राहिल असे सतपद आहे अमरफळ खाल्ल्याने जसा मनुष्य अमर होऊन जातो तसे गुरुपद हे सतपद आहे या गुरुपदाची भक्ती केल्याने हंस अमर होऊन जातो तो कधी गर्भात येत नाही आणि रामापर्यंत म्हणजे होणकाळ पारब्रम्ह पर्यंतच्या भक्त्या अन्न,जल व गाजर मुळी खाण्या समान आहे ह्या सर्व भक्त्या फलवान आहेत.निष्फल कोणीही नाही.म्हणजे मायेच्या करण्या करुन व होणकाळ पारब्रम्ह रामाचे रटण करुन संत पारब्रम्हच्या मुक्ती पर्यंतचे फळ प्राप्त करतो.गुरुचे सतपद प्राप्त करु शकत नाही. म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,या नाना विधीच्या सर्व भक्त्या मातापद किंवा पितापद म्हणजे कुळाचे फळ प्राप्त करण्याचेच उपाय आहे माता पित्याच्या पलिकडचे गुरुपद प्राप्त करण्याचा उपाय नाही. ।।२७।।

काम सरब इण जग का ।। कहया करे सब आय ।।
पण चिजां की प्रक्षा ।। किस बिध किवि जाय ।।
किस बिध किवि जाय ।। ग्यान इण आसे जाही ।।
लाख कहो कोई आण ।। समझ तो घट के माही ।।
सुखराम नाम सत दुलभ हे ।। सिमरण स्हेज उपाय ।।
पण भेदा भेद मे भेद रे ।। किम द्रसावे लाय ।। २८।।

जगात सर्व काम सांगितल्यावर सर्व काम करु शकतात त्याकरीता त्यांना घटात उंडी समज राहण्याची गरज नाही परंतु राग,नाडी,न्याय यांची परीक्षा शिकणे हे फक्त ज्ञान ऐकून नाही होत त्याकरीता त्या वस्तुची जीवाच्या उरात आधी पासूनच उंडी समज पाहिजे ती त्याच्यात समज नसेल तर लक्ष प्रकारचे उपाय केले तरी राग,नाडी,न्याय या वस्तुंच्या परीक्षेच्या विधिचे ज्ञान घटात प्रगट होणार नाही भले तो रात्रं दिवस राग, नाडी,न्याय या वस्तुना,जाणणारे प्रविण जाणकारां सोबत शिकण्याकरीता त्यांच्या मुखाने ज्ञान ऐकत राहिले अशाच प्रकारे रामनाम घेणे व अन्य करण्या सहज आहे परंतु सतगुरुमध्ये जे सत आहे त्या सतला समजणे कठीण आहे त्याला समजण्या–करीता होणकाळ काय आहे,त्रिगुणीमाया काय आहे,जीव काय आहे,जीवाचे मन काय आहे,जीवाचे पाच आत्मा काय आहे?या सर्वाच्या भेदातील भेद जीवाच्या उरात भासला पाहिजे मगच या भेदातील भेदाचा भेद जो सतस्वरुप आहे तो समजेल राम घेणे सहज उपाय आहे त्याच्याने सतगुरुतील सत शिष्याच्या घटात प्रगट होणार नाही.

।।२८।।

रागी पागी पारखुं ।। नाड़ी बेद रूं न्याव ।।
इण बिध ग्यान प्रकास रे ।। किस बिध सीख्यो जाय ।।
किस बिध सीख्यो जाय ।। ग्यान पद कहत न आवे ।।
कथणी सबे उपाय ।। ब्रम्ह माया कूं गावे ।।
सुखराम समझ यूं ग्यान की ।। उपजे नर उर माय ।।
रागी पागी पारखुं ।। नाड़ी बेद अरूं न्याव ।।२९।।

रागी म्हणजे गाणारा,पागी म्हणजे पायाचे चिन्ह ओळखणारा पारखू,नाडी वैद्य आणि न्याय यांचे ज्ञान ऐकल्याने किंवा शिकल्याने घटात प्रकाशित होत नाही अशाच प्रकारे ज्ञानी विज्ञान पद ऐकल्याने किंवा शिकल्याने घटात प्रकाशित होत नाही.जसे–रागी, पागी,पारखू,नाडी वैद्य व न्यायाचे ज्ञान मनुष्य उरात ज्ञानाची समज राहील तरच प्रकाशित होते अशाचप्रकारे ज्ञान विज्ञान प्रकाशित होईल ऐकून व शिकून प्राप्त केलेले उपाय ब्रम्ह आणि मायेपर्यंत पोहचण्याचे आहे.गुरुपदात पोहचण्याचे नाही. ।।२९।।

करम बड़ा बळबान हे ।। कन बळवंत हे करतार ।।
होण हार कन जबर हे ।। संताँ करो बिचार ।।
संताँ करो बिचार ।। राम तो घट घट होई ।।
जेती करी उपाय ।। ब्रम्ह लग ओर न कोई ।।
सुखराम धणी तो को नही ।। क्हो कुण कर्णे हार ।।
क्रम राम होण हार हे ।। तीनु अड्या बिचार ।।३०।।

कर्म मोठे आहे का कर्म करणारा कर्तार मोठा आहे,का होनहार मोठा आहे याचा संतांनो विचार करा राम तर प्रत्येक घटा घटात बसलेला आाहे.जितके करणी क्रियेचे उपाय जीव करतो ते सर्व ब्रम्ह म्हणजे होणकाळ पर्यंतच जातात आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,चेतन जीवाच्यावर तर कोणी धनी नाही मग करणारा कोण आहे?अशा प्रकारे कर्म,राम म्हणजे चेतन जीव व होनहार आपसात म्हणजे माया,जीव चेतन तसेच होनहारामध्ये मोठे कोण आहे?अशी आड्वी तिघांमध्ये पड्ली आहे.।।३०।।

कर्म राम तो एक ही ।। देखो ग्यान बिचार ।।
बिन चेतन करतार रे ।। क्हो कुण कर्णे हार ।।
क्हो कुण कर्णे हार ।। ब्रम्ह माया सब एकी ।।
आद अंत अरू मध ।। कबू न्यारी नही देखी ।।
सुखराम समो हुण हार रे ।। पुळां ज न्यारी होय ।।

अे कर्ता बस को नही ।। सुण ग्यानी कहु तोय ।।३१।।

कर्म आणि होणकाळ राम एकच आहे ज्ञानाने विचार करा हा जीव चेतनच करतार आहे.जीव चेतन शिवाय आणखी कोणी कर्म करविणारा नाही जीव मायेशी कर्म करतो त्याच्यात होणकाळ ब्रम्ह आहे अशाप्रकारे ब्रम्ह आणि माया हे आद,मध्य व शेवट पर्यंत एकच आहे ही माया होणकाळाहून वेगळी कधी नाही पाहिली या जीव कर्तारा सोबत होणहाराचे पुल म्हणजे वेळ नाही बाकी सर्व कर्म चेतन जीव कर्तारच्याच वश मध्ये आहे म्हणजे होनहारचा कर्ता कोणी दुसरा आहे.म्हणजे चेतन जीवाच्यावर जो होनहार आहे आणि होनहाराच्या वर सतस्वरुप राम आहे हे ज्ञानाने समजा. ।।३१।।

झगड़ झगड़ बहु झगडियाँ ।। झगड़ो मिटे न कोय ।।
इंऊ करणी सूं सुण हंस का ।। कर्म न दूरा होय ।।
क्रम न दूरा होय ।। रोस लेग्यो मन माही ।।
तब पुगे सुण डाव ।। तां दिन चुके नाही ।।
सुखराम ग्यान बिन सुळझिया ।। निर्भे कबू न होय ।।
झगड़ झगड़ ब्हो झगड़ियाँ ।। झगड़ो मिटे न कोय ।।३२।।

भांडून–भांडून जसे खुप भांडल्याने भांडण मिटत नाही तसेच करणी केल्याने जीवाचे कर्म दूर होत नाही जसे भांडण करणाऱ्या दोघांच्या मनात रोष बनलेलाच राहतो,तो रोष भांडून–भांडून मिटत नाही तसेच कर्म केल्याने कर्म मिटत नाही.भांडण करणाऱ्याचा डाव येईल त्या दिवशी धोका करण्यात तो चुकणार नाही आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की भांडण करणाऱ्याला भांडण सुटल्याशिवाय धोका बनलेलाच राहतो तसेच जीव मनाने, कर्मांपासून काळापासून भयरहीत कधी होणार नाही काळ डाव आल्यावर जीवाला पकडण्यात कधी ही चुकणार नाही.त्याला घटात सतस्वरुप विज्ञान ज्ञान प्रकटल्यानंतरच काळाचे भय राहणार नाही,तो काळापासून मुक्त निर्भय बनून जाईल.म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जसे भांडून–भांडून भांडण मिटत नाही तसेच कर्मांपासून म्हणजे नवे कर्म करुन कर्म मिटणार नाही म्हणजे काळापासून मुक्त होणार नाही. ।।३२।।

राड़यां राड़ं न भागसी ।। अन्न सूं भूक न जाय ।।
जळ सूं त्रषा नैं बुझे ।। बोहो जळ पीयो आय ।।
बोहो जळ पीयो आय ।। नींद सुय नींद न जावे ।।
इंऊ करणी सुं करम ।। कर्मा को छेह न आवे ।।
सुखराम क्हे वां चीज कहो ।। अे फेर न लागे आय ।।
राड़यां रांड़ न भागसी ।। अन सूं भूक न जाय ।।३३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात खुप भांड्ण केल्याने भांड्ण मिटत नाही जसे अन्न खाल्ल्याने नेहमी करीता भुक जात नाही पाणी प्याल्याने किंवा वारंवार पाणी प्याल्याने नेहमी करीता तहान मिटत नाही जास्त झोप घेऊन घेतली तर नेहमी करीता झोप जात नाही त्याचप्रकारे करणी केल्याने मागचे कर्म संपत नाही उलट ते नवे कर्म जीवावर लादले जातात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात वारंवार खाल्ल्याने जास्तीची भुक जात नाही किंवा भांड्ल्याने भांड्ण मिटत नाही अशाच प्रकारे वारंवार नवी क्रिया करणी केल्याने केलेले जुने कर्म मिटत नाही ज्याच्याने जुने कर्म मिटतील व नवे कर्म लागणार नाही ती वस्तु काय आहे ती सांगा. ।।३३।।

रांड़ साच सूं भागसी ।। भूक सत्त सूं जाय ।।
सतगुरू असी चीज ।। फळ अमर देवे लाय ।।
फळ अमर देवे लाय ।। जोग तो रोग गमावे ।।
यूं गुरू पद मे समझ ।। हंस प्रम मोख सिधावे ।।
सुखराम ब्रम्ह लग ग्यान सो ।। वे झूटा जग माय ।।
राड़ साच सूं भागसी ।। भूक सब्द सूं जाय ।।३४।।

आदि सतगुरु सुखरामजी सांगतात की जसे भांड्ण सत्य बोलण्याने पळून जाईल.ज्या असत्यामुळे भांड्ण होते ते न्यायाने सोड्वून घेतले म्हणजे सत्याने सोडविले की ते भांड्ण संपून जाईल.अशाचप्रकारे वासनेची भुक सतवैराग्याने जाईल सत वैराग्याशिवाय वासनेची भुक कधी जाणार नाही शरीरात रोग आहे तो भोगाने कधी जाणार नाही त्यासाठी योग करावा लागेल तो योग रोग घालवून देईल असेच सतगुरुचा शरणा घ्याल तर सतगुरु काळ कर्मांना कापून देतील.ते सतगुरु हंसाला गुरुपदात पोहचविण्याचे अमरफळ देतात ते अमर फळ खाल्ल्यावर परममोक्ष प्राप्त होतो जसे भांड्ल्याने भांड्ण मिटत नाही व अन्न खाल्ल्याने भुक जात नाही त्याचप्रकारे होणकाळापर्यंतचे कर्म क्रिया परमसुखात पोहचवत नाही ह्या सर्व क्रिया खोट्या आहेत.यांच्या भरवश्याने अमरलोक मिळेल हे विचार करणे खोटी सोच(समज)आहे.।।३४।।

संक्राचार्ज बोलिया ।। से बायक कहुं तोय ।।
अंछया कारी ब्रम्ह की ।। अे कहिये प्रगट दोय ।।
अे कहिये प्रगट दोय ।। बास हु तिके नाही ।।
बिन केवळ अरस परस ।। कुछ सूझे नही माही ।।
सुखराम ज्हां लग पूगिया ।। ज्यांहा मेहेर की जोय ।।
संक्राचार्ज बोलिया ।। से बायक कहुँ तोय ।।३५।।

शंकराचार्यांचे वचन आहे की होणकाळ पारब्रम्ह आणि इच्छा प्रगट रुपात दोन दिसतात

ते दोन असले तरी एकच आहे कारण इच्छा ही ब्रम्हची कार्यकर्ता आहे शंकराचार्य सांगतात की तरी ही ज्ञानींनो ब्रम्ह वैरागीच आहे असे दिसते ब्रम्हमध्ये माये सोबत भोग करण्याची वासना आहे हे दिसत नाही केवळ ज्ञानाच्या अरस परस झाल्याशिवाय ब्रम्हला मायेसोबत भोग भोगण्याची वासना आहे हे कोणालाही दिसणार नाही केवळ ज्ञान उपजल्यानंतरच तो वैरागी नाही तो मायेचा भोगी आहे हे ऐकेल आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे केवळ प्रगट करण्याकरीता सतगुरुची मेहर लागते.।।३५।।

न्यारो पद कूं सब कहे ।। भेदं न जाणे कोय ।।
अेके माहे अनेक हे ।। अेक अनेकां होय ।।
अेक अनेकां होय ।। तहाँ लग न्यारो नाही ।।
जे ब्रम्ह की पेदास ।। कोण बिध न्यारो कुवाही ।।
सुखराम ब्रम्ह सूं दूसरो ।। सो मत्त न्यारो होय ।।
न्यारो पद कूं सब कहे ।। भेद न जाणे कोय ।।३६।।

ज्ञानी ध्यानी ब्रम्हपदाला मायापदा पेक्षा वेगळे सांगतात.ही माया आधीपासून मध्य व अंतपर्यंत ब्रम्हहून वेगळी नाही या ब्रम्ह व मायेच्या संसारानेच या एक त्रिगुणी मायेपासून अनेक माया बनली आहे जसे जगात आई–वडिल असतात.वडिल आणि आई दिसतात दोन परंतु असतात एकच वडिलाद्वारा–आई पासून अनेकांची उत्पत्ती होते म्हणून आई आणि जन्मलेले पुत्रांचे घर वडिलापासून वेगळे आहे हे कोण म्हणेल तसेच ब्रम्ह पित्याला माया माता व मायेपासून उत्पन्न झालेली सगुणी मायावी रुपांपासून वेगळी कसे म्हणाल जगात जसे या गृहस्थी आई वडिला पासून वैरागी साधु वेगळा राहतो तसे होणकाळ ब्रम्ह पिता व त्रिगुणी माता पिता याच्याहून वेगळा मतवाला या दोघांपेक्षा वेगळा आहे हा भेद ज्ञानी जाणत नाही याकरीता पितारुपी ब्रम्हलाच कुळापासून वेगळा समजतात आणि त्याची भक्ती करुन कुळातच काळाचे दु:ख भोगत पडले राहतात. ।।३६।।

जळ सुं उपजी चीज रे ।। सो सब अेकी होय ।।
यूं मुख चडिये सुण नांव मे ।। न्यारो नाव न कोय ।।
न्यारो नाव न कोय ।। सभ को फेर कहावे ।।
------------ ।। नटे सो पर्ळे जावे ।।
सुखराम नाव न्यारो तको ।। कवीन पावन कहूं तोय ।।
जळ सूं उपजी चीज रे ।। सो तब अेकी होय ।।३७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की जसे पाण्यापासून उत्पन्न झालेल्या वस्तु सर्व एकच आहेत त्या सर्व वस्तुंमध्ये पाणीच मिळेल.त्या वस्तुंमध्ये अमृत मिळणार

नाही अमृता पासून उत्पन्न झालेल्या वस्तु मध्येच अमृत मिळेल असेच मुखाने बोलले जाणारे नाव माया ब्रम्हचे नाव नाही आहे हे रटणे म्हणजे काळाच्या मुखात जाणे आहे अशा प्रकारे जे नाम वेगळे आहे ते जे मुखाने बोलले जात नाही ते सतगुरु मेहर शिवाय कधी प्राप्त होत नाही तेच नाम सर्वांत वेगळे आहे बाकी सर्व मुखाने बोलणारे नाम एकच जसे पाण्यापासून उत्पन्न झालेल्या वस्तु सर्व एकच आहेत. ।।३७।।

दोय चीज जोड़े खड़ी ।। जात पांत बिध दोय ।।
सो न्यारी सुण जाणिंये ।। ओर अेक सब होय ।।
ओर अेक सब होय ।। भेद असो कोई पावे ।।
इंऊं न्यारो निझ नाव ।। सोझ कोई मोहे बतावे ।।
सुखराम ब्रम्ह बिन नाम रे ।। सो सुण बीजो होय ।।
दोय चीज जोड़े खड़ी ।। जात पांत गुण दोय ।।३८।।

जसे दोन जातीचे लोक जोडीने उभे आहेत उदा.हिंदु मुसलमान आहे दोन्ही जाती पातीत काही लोक सुख समृध्दीवाले राहतील तर काही लोक दु:ख दरिद्रीवाले राहतील दोन्ही जाती पातीचे समृध्दीवाले सारखे आहे परंतु जातपात वेगळी असल्यामुळे वेगळे आहेत. समृध्दी सारखी आहे म्हणून हिंदु-मुसलमानाची जात एक होत नाही तसेच दोन्ही जातीपातीत सारखे गरीब आहे याचा अर्थ दोन्ही गरीब आपसात एक नाही झाले हे दोन्ही जातीपातीपासून वेगळे असल्याकारणाने वेगळेच राहिले एकाच जातीचे गरीब अमीर,श्रीमंत,चतुर,विद्वान हे एक बनून राहिले.दुसऱ्या जातीचे लोक यांच्यापेक्षा वेगळे आहे जसे दोन जाती-पाती वेगळ्या असतात असा भेद ज्याला समजतो तोच निजनाम हे मुखाने बोलणाऱ्या माया-ब्रम्हच्या नामापेक्षा वेगळा राहतो हे शोधून मला सांगु शकतील ज्याला दोन जाती-पाती वेगळ्या असतात हा भेद समजत नाही तो निजनाम ब्रम्ह-मायेपासून वेगळा राहतो असे कधी समजू शकत नाही. ।।३८।।

राम नाम की टेक रे ।। सुणो जक्त के होय ।।
सामा मिलीयां सब कहे ।। भेष न केहे कोय ।।
भेक न कहे कोय ।। तको कारण सुण कांई ।।
ग्यानी सोझ बताय ।। कोण इधको यां मांई ।।
सुखराम पंथ सब भेष का ।। न्यारा कर कर जोय ।।
राम नाम की टेक रे ।। सुणो जक्त के होय ।।३९।।

सर्व जगाचे लोक आपसात समोर भेटल्यावर रामराम म्हणतात परंतु भेषधारी आपसात भेटल्यावर कधीही राम राम म्हणत नाही.जग रामनामाला मोठे समजने आणि वेशधारी जे संसारापासून वेगळे होऊन वैरागी बनले आहे ते आपसात रामराम बोलत नाही तर

याचे काय कारण आहे याच्यात मोठे कोण आहे हे ज्ञान विचार करुन मला सांगा हा एक वेशधारी रामराम बोलत नाही असे नाही सर्व वेगवेगळ्या पंथाचे वेशधारी आपसात पाहून आपसात रामराम बोलत नाही या वेशधारीकडून संसारात कर्म होतात याकरीता संसाराच्या सुखांचे त्यागन केले आहे जर राम नाम मोठे आहे,त्याच्याहून अधिक सुख मिळते तर वेशधारी का बोलत नाही. ।।३९।।

बाहा गुरू नानकं कहयो ।। साहेब कहयो कबीर ।।
जेन धरम बंदणा करे ।। राम की गत कहे बीर ।।
राम की गत कहे बीर ।। कोण ईध को या मांही ।।
दत्त नार्द तत्त चीन ।। ओ कियो कुछ नाही ।।
सुखराम क्हे रघुनाथजी ।। किसन कह्यो क्या बीर ।।
वाहा गुरू नानक कहयो ।। साहेब कह्यो कबीर ।।४०।।

गुरुनानकाच्या पंथात वाहे गुरु म्हणतात असे वाहे गुरु म्हणून कोणी गुरुनानक सारखा मोक्षाला गेला आहे का?नाही गेला तसेच कबीर साहेबाचे शिष्य साहेब साहेब म्हणतात. साहेब साहेब म्हटल्याने कोणी मोक्षाला गेला आहे का?नाही गेला वंदना केल्याने २४ तिर्थकरांसारखा कोणी मोक्षाला गेला काय?नाही गेला अशाचप्रकारे संतांची रामनाम म्हणण्याची गती आहे.रामनाम म्हटल्याने ही आजपर्यंत कोणी मोक्षाला गेले नाही ते ज्या तत्ताने मोक्षाला गेले नाही ते ज्या तत्तने मोक्षाला गेले ते तुम्ही ओळखा नानकजी, कबीरजी,२४ तिर्थंकर मोठे होते का वाहे गुरु म्हणणारे,नानकजीचे शिष्य,साहेब म्हणणारे, कबीरजीचे शिष्य का वंदना म्हणणारे २४ तिर्थंकरांचे शिष्य यांच्यात अधिक कोण आहे?हे ज्ञानाने मला सांगा असे जगात अनेक मायेचे नाव आहेत ज्याच्यात तत्त नाही दत्तात्रय,नारद,रघुनाथ,किसन यांनी वाहे गुरु,साहेब,वंदना या नामांचा जप केला नाही यांनी ज्या नामाला ओळखले ते तु ओळख तरच तु काळापासून सुटशील.।।४०।।

राम केहेर सत्तियां बळे ।। मोख किसी कोहो जाय ।।
ओर संत प्रहलाद ध्रुरू ।। मिले कोण पद माय ।।
मिले कोण पद माय ।। सोझ ओ अरथ बतावो ।।
रंरकार की पोंच ।। सोझ निर्णो सब लावो ।।
सुखराम बस्त गुण ना छिपे ।। खाया नर ऊर माय ।।
राम केहे सत्याँ जळे ।। मोख किसी कोहो जाय ।।४१।।

राम राम म्हणून सतींना अग्नीडाग दिला जातो काय त्या मोक्षाला गेल्या.संत प्रल्हाद व ध्रृवने राम राम केले काय ते मोक्षाला गेले तसेच ध्रृव, प्रल्हाद कोणत्या पदाला पोहचले ते पद सांगा.ररंकार म्हणजे रामनामाची पोहच मोक्षापर्यंत आहे की नाही याचा शोध

करा आणि नंतर निर्णयावर जा शोध न करता निर्णयावर जाऊ नका मनुष्याने कोणती ही वस्तु खाल्ली असेल त्या वस्तुचा गुण खाणाऱ्याच्या मुखाने प्रगट होईलच तो गुण जसा लपत नाही असेच रामनाम म्हटल्याने सती ध्रूव तसेच प्रल्हाद कोठे पोहचले हे लपणार नाही. ।।४१।।

राम राम केहे मिलत हे ।। सो प्रगट कहुँ तोय ।।
गत्त मुक्त लग पहुँच हे ।। आगे पहुँच न कोय ।।
आगे पहुँच न कोय ।। बचन मानो सब आई ।।
ध्रु रटियो प्रहलाद ।। सुर्ग किऊं बेठा जाई ।।
सुखराम सत्ती सत्त बाड़ मे ।। जाय सर्ब कहुं जोय ।।
राम राम केहे मिलत हे ।। सो प्रगट कहुं तोय ।।४२।।

राम राम म्हणणारे गती व मुक्ती पर्यंतच पोहचतात होणकाळाच्या पुढे सतस्वरुपात नाही पोहचत हे प्रगट रुपाने सांगत आहे यांची होणकाळाच्या पुढे पोहच नाही हे माझे वचन सर्व माना ध्रूव व प्रल्हाद ने रामनाम रटले मग ते स्वर्गात का बसले आहे? प्रल्हाद इंद्र बनण्याच्या प्रतिक्षेत बसला आहे आणि ध्रूव वैकुंठा समोर अटलपद सांभाळून बसला आहे सती सत्तवाड्च्या लोकात बसली आहे हे कोणी ही होणकाळाच्या पुढे सतस्वरुपात गेले नाही. ।।४२।।

सत्त बोल्याँ गत को ।। संत धरम ओ नाय ।।
जगत बरोबर संत हुवा ।। वां पकड़यो जग माय ।।
वां पकड़ये जग माय ।। संत आ टेक न धारे ।।
ओ पद के क्रतारा ।। काळ व्हेय ओई मारे ।।
सुखराम ब्रम्ह लग ठोड़ हे ।। आगे कबून जाय ।।
राम नाम सत कहो ।। संत रटे ओ नाय ।।४३।।

रामनाम सत्त आहे,सत्य बोला गत्य आहे हे मृतकाला स्मशानात जाळण्यास घेऊन जाते वेळी बोलतात हा सतस्वरुपी संताचा धर्म नाही हा होणकाळी संताने ज्याची पोहच संसारी लोकांसारखी होणकाळापर्यंतच होती त्यांनी पकडलेला धर्म आहे हे रामनामाचे पद कर्तारचे पद आहे हाच सृष्टी बनवितो आणि हाच काळ बनून सृष्टीच्या एक एकाला मारतो ब्रम्हरामाची भक्ती करुन ध्रूव,प्रल्हाद सती ब्रम्हच्या पदातच बसले आहेत पुढे गेले नाही. पुढे पोहचविणारा शब्द या रामनामापेक्षा वेगळा आहे तो ने:अक्षर आहे.अखंड्ति ध्वनीस्वरुप आहे.तो मुखाने बोलला जात नाही,कागदावर लिहिले जात नाही असा आहे.।।४३।।

पड़े जक्त मे भीड़ ।। आण राजा के देवे ।।

युं नर नारी आण ।। राम सरणो सब लेवे ।।
गत मुक्त को न्याव ।। ब्रम्ह सारे सुण होई ।।
ज्यूं राजा बस जहान ।। खेत घर देवे सोई ।।
ग्यान धरम ओ रिष को ।। राजा को ध्रम न्याय ।।
सुखराम मोख गुरूपद मिले ।। यूं राम ब्रम्ह नही जाय ।।४४।।

राजाची सत्ता जगाच्या लोकांवर कष्ट पडले तर त्यांना शेत,घर,धन देण्याची आहे जेव्हा जगाच्या लोकांवर कष्ट पडतात तेव्हा स्त्री–पुरुष राजाचा शरणा घेतात आणि राजाकडून आपल्या कष्टाचे निवारण करतात परंतु वैराग्य विज्ञान शिकण्याकरीता जगातील स्त्री–पुरुष राजाजवळ जात नाही,ऋषीजवळ जातात अशाचप्रकारे गत,मुक्त (गती मुक्ती)देणे हे होणकाळ रामाचे सार आहे जेव्हा स्त्री–पुरुषांवर शरीराचे व मनाचे दु:ख पडतात तेव्हा जगाचे स्त्री–पुरुष ब्रम्हराम राजाचा शरणा घेतात आणि गत मुक्त पर्यंतचे सुख प्राप्त करतात गती,मुक्तीच्या पुढे विज्ञान वैराग्य प्राप्त करण्याकरीता जगातील स्त्री–पुरुष होणकाळ ब्रम्हच्या जवळ जात नाही ते सतस्वरुपी रामाजवळ जातात.होणकाळ राम हा काळ आहे तर सतस्वरुपी राम काळापासून तारणारा खरा राम आहे ज्याला सतगुरु म्हणतात. ।।४४।।

धन माल बिन काज ।। भूप की आण दिरावे ।।
कहो ग्यान के काज ।। कोण राजा पे जावे ।।
कोण राजा पे जावे ।। ज्या मोख बिध काम न काई ।।
गुरू पद चाहिये सत ।। छोड हद बेहद जाही ।।
सुखराम हे अनाद रे ।। अे पद दोनूं होय ।।
अेक पद करतार रे ।। अेक गुरू पद जोय ।।४५।।

धनमाल व धंद्यात काही अडचण आली तर राजाचा शरणा घेऊन राजाकडून सोडवितात परंतु वैराग्य ज्ञान पाहिजे असेल तर राजाजवळ आजपर्यंत कोणी गेले आह का?ते गुरुजवळ जातात अशाचप्रकारे मायेचे सुख पाहिजे असेल तर होणकाळ ब्रम्हजवळ जातात परंतु मोक्ष पाहिजे असेल तर सतस्वरुपी सतगुरुजवळ जातात. सतस्वरुपी गुरुचा शरणा घेतल्यावरच हद व बेहद म्हणजे मायेचे ३ लोक १४ भवन व बेहदचे ३ ब्रम्हचे १३ लोकांचे उल्लंघन होईल आणि तो हंस मोक्षाला जाईल.जसे धन,माल व धंद्याची अडवी(अडचण)सुधारण्याकरीता राजाचे पद आहे आणि वैराग्य प्राप्त करण्याकरीता गुरुपद आहे असेच त्रिगुणी मायेचे सुख प्राप्त करण्याकरीता कर्तार ब्रम्हपद आहे आणि सतवैराग्य परममोक्ष प्राप्त करण्याकरीता सतस्वरुप सतगुरुपद आहे हे दोन्ही पद अनादपासून आहे आणि वेगवेगळे आहे.।।४५।।

भूप रेत ने खोस ले ।। भूपी दे घर खेत ।।
भोग सकळ जग भरत हे ।। कोई अन बच्चे देख ।।
कोई अन बच्चे देख ।। ब्रम्ह ब्रम्ह सकळ पुकारे ।।
जे घर छोडे खेत ।। तके नही भूपत सारे ।।
------------||-------------||

भूप रेत कुं खोसलो ।। भूप देत घर खेत ।।४६।।

राजाच जगातील लोकांना घर,शेत देतो व राजाच घर,शेती खोस खेचून घेतो राजाच्या आधाराने सर्व जगत राजाच्या राज्यात सुख दु:ख भोगतो या सुख दु:खाने राजाचा कोणताही मनुष्य वाचत नाही परंतु ज्याने राजाचे शेत घर सोडून दिले आहे त्याच्यावर राजाची सत्ता संपून जाते असेच मायेचे सुख चाहणारे होणकाळ ब्रम्हचा आसरा घेतात आणि होणकाळ ब्रम्हची भक्ती करतात होणकाळ ब्रम्हमधील सुख-दु:खाचे दोन्ही फळ आहे होणकाळ ब्रम्हचा भक्त काळाच्या भयाने मुक्त होत नाही कारण की होणकाळ ब्रम्ह स्वत:च काळ आहे पंरतु ज्याने त्रिगुणी मायेचे सुखच त्यागून दिले आहे आणि ज्ञानपद धारण केले आहे ते ब्रम्हच्या वश मध्ये नाही म्हणून त्याला ब्रम्हकाळ घेरत नाही. ।।४६।।

यान पद ज्याँ पाविया ।। से राजा बस नाय ।।
ओर उधम सब भरत हे ।। डंड राज मे जाय ।।
-----------||-----------||
------------||-------------||
-----------||-------------||४७।।

।। चोपाई ।।

जसे राजा उद्योग करणाऱ्यापासुन राज्यामध्ये दंड म्हणजे टॅक्स इत्यादी घेतो परंतु ज्याने उद्योग सोडून दिला आहे आणि वैरागी बनून गेला आहे आणि राजाच्या राज वश मध्ये राहत नाही म्हणून त्याच्यापासून दंड किंवा टॅक्स घेत नाही अशाचप्रकारे ज्याने ज्याने सतगुरु वैराग्य ज्ञानपद प्राप्त केले आहे ते सर्व काळाच्या दंडापासून मुक्त होऊन जातात. ।।४७।।

संत सिरे आणंद पद भाई ।। सत्त रूप सतस्वरूप कहाई ।।
सत्त सकळ सिर नायक होई ।। ओर सकळ पद मिथ्या साई ।।१।।

सत म्हणजे जे आधी ही होते,आज ही आहे आणि अंत ही राहील,कधी मिटणार नाही असे त्रिकाळ सत्य व आनंद म्हणजे आधीपासून आजपर्यंत आणि पुढे ही आनंदात कमी नाही आहे,अभाव नाही असे आनंदाचे पद आहे श्रेष्ठ म्हणजे सर्व आनंदामध्ये

अप्रतिम आनंद आहे असे सतरुप आनंदपदला सतस्वरुप म्हणतात हे सतपद होणकाळ पारब्रम्ह,त्रिगुणीमाया आणि जीवाच्यावर नायक आहे जीवाला जो आनंद पाहिजे तो मिळत नाही व गर्भाचे आवगमनाचे आणि काळाचे दु:ख सुटत नाही याकारणाने जीवाला राहण्याकरीता हे खोटेपद आहेत. ।।१।।

**सतस्वरूप को भेद न पावे ।। जब लग हंसा अे पद संभावे ।।**
**नही नही दोस हंस के माही ।। सतस्वरूप वो पावे नाही ।।२।।**

हंसाला सतस्वरुप भारी सुखांचा दाता आहे हा भेद नसल्याकारणाने धारण करीत नाही परंतु अज्ञान वश मायेच्या तसेच ब्रम्हच्या खोट्या सुखांना खरे सुख समजून मायेच्या व ब्रम्हच्या पदालाच खरे सुख देणारा आहे असे समजतात असे समजून माया व ब्रम्हला धारण करुन घेतो याची ना समज असल्यामुळे हंस हि भुल करतो म्हणून हंसात दोष आहे असे समजू नका हंसाला सतस्वरुप भेद मिळत नाही मग या हंसाने करावे तरी काय? ।।२।।

**आतो अेक अगम गत होई ।। केहेण सुणण मे नही आ कोई ।।**
**पाप पुन्न सू कदे न पावे ।। धन ग्यान क्यूँ ही अर्थ न आवे ।।३।।**

सतस्वरुप हे अगम आहे याला ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती तसेच ब्रम्ह व इच्छा हे ही जाणत नाही अशा अगम सतस्वरुपाचे ज्ञान संसारात कोणी सांगत नाही म्हणून ऐकण्यात येत नाही हे सतस्वरुप पाप म्हणजे निचकर्म करुन मिळत नाही म्हणजे निच कर्म करविणारे देवता जसे–भैरु,क्षेत्रपाल,मोगा,कालिका,सितला यांची भक्ती केल्याने मिळत नाही(हे निचकर्मी का?)यांना कोंबडा,बकरा अशा निरअपराध प्राण्याची बळीची चाहणा राहते अशी बळी दिल्यावर ते प्रसन्न होतात हे पुण्य म्हणजे शुभ कर्म म्हणजे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्तीची भक्ती केल्याने मिळत नाही हे सतस्वरुप धनाने मिळत नाही तसेच वेद, शास्त्र,पुराण ज्ञानाच्या आधाराने मिळत नाही.अशी त्याची गती अगम म्हणजे जे साधन उपलब्ध आहे त्या साधनांच्या बाहेरची आहे म्हणून हंसांना सतस्वरुप प्राप्त होत नाही. ।।३।।

**तिर्थ व्रत देव सब पुजे ।। जप तप किया ही सत नही सुजे ।।**
**जिग कियां सुँही लेस न आवे ।। साझन कदे कोई नही पावे ।।४।।**

तो सतस्वरुप तीर्थ,व्रत व देवतांची पुजा केल्याने प्राप्त होत नाही तो सतस्वरुप जप,तप,केल्याने प्रगट होत नाही तो सतस्वरुप भारी भारी यज्ञ केल्याने लेशमात्र ही प्राप्त होत नाही तसेच अनेक मायावी साधन केल्याने कधी ही कोणालाही प्राप्त होत नाही अशी त्याची विधी सर्वांहून अगम आहे.।।४।।

**संख जोग अष्टंग सुण होई ।। पवन जोग चडावे कोई ।।**

तो ही ओ भेद न पावे प्यारा ।। सत कळा को कहुँ बिचारा ।।५।।

कोणी ब्रम्हाचा सांख्ययोग प्राप्त करुन घेतो,कोणी शंकराचा अष्टांगयोग प्राप्त करुन घेतो,कोणी पवन योग साधुन भृगुटीत श्वास चढवून घेतो परंतु सत्तकलेचा प्रिय भेद ह्या विध्याकरणाऱ्यालाही प्राप्त होत नाही अशी सत्तकला ही अगम विधी आहे.।।५।।

**गुरू किरपा कर मंत्र देवे ।। सिष सब सीख धर उर लेवे ।।**
**आ बिध अनंत जनम लग होई ।। सतनाम पावे नही कोई ।।६।।**

गुरु शिष्यावर कृपा करुन मंत्र देतो तो मंत्र शिष्य हृदयात धारण करतो आणि अनंत जन्मभर शिकतो म्हणजे त्याच्या वयात मनुष्यांच्या अनेक पिढ्या प्रलयात गेलेल्या राहतात अशी त्याची आयु वाढत राहते अशा शिष्याला ही सतनामाची गती प्राप्त होत नाही.।।६।।

**मुख सू कहे जन नाम बतावे ।। सो सिष सीख धार घर जावे ।।**
**भजो रात दिन रहो लिव लाई ।। सतस्वरूप न पावे भाई ।।७।।**

संत शिष्याला मुखाने नाम सांगतात ते नाम शिष्य शिकून हृदयात धारण करतो घरी जावून रात्रं-दिवस लिव लावून त्या नामाला भजतो अशी विधी केली तरी ही शिष्यात सतस्वरुप प्रगट होत नाही. ।।७।।

**राम राम कोई आण बतावे ।। तो पण सतस्वरूप ना पावे ।।**
**सत साहेब कहे निस दिन कोई ।। अंतकाळ जासी जब रोई ।।८।।**

कोणी शिष्य सतस्वरुपाला राम समजून राम राम हे ५२ अक्षरी शब्दांचे उच्चारण करुन जपतो तरी ही ती सतस्वरुपी राम शिष्यात प्रगट होत नाही सतस्वरुप हे सतसाहेब म्हणजे नेहमी राहणारे आहे तसेच सर्वांहून मोठा आहे म्हणून ५२ अक्षरांच्या शब्दाने सतसाहेब सतसाहेब असा जप करतो तरी ही त्याच्यात सतसाहेब प्रगट होत नाही सतसाहेब प्रगट न झाल्यामुळे अंतकाळी काळाच्या मुखातच जातो.।।८।।

**परम मोख निरभय पद गावे ।। सत साहेब कहे कदे न पावे ।।**
**केहेणी सकळ झूट हे सारी ।। बाय सबद सो बके बिचारी ।।९।।**

परममोक्ष परममोक्ष व निर्भय पद भजल्याने सतसाहेब कधी प्रगट होत नाही हे सर्व शब्द भजने खोटे आहे हे सर्व ५२ अक्षरांचे शब्द आहे हे त्या सतस्वरुपाच्या ध्वनीला जगात समजण्या-करीता संतांनी वापरलेले शब्द आहे हे शब्द म्हणजे त्या सतस्वरुपी संतांमध्ये प्रगट झालेली ध्वनी नाही ती ध्वनी ५२ अक्षरांच्या पलिकडे आहे.।।९।।

**हीरा कहे मुंगिया कोई ।। निस दिन कहेण मुख ईयाँ होई ।।**
**कहो वां के घर हीरा आवे ।। तो सत साहेब कहे वो पद पावे ।।१०।।**

हिरा-हिरा किंवा मुंगीया-मुंगीया रात्रं-दिवस तोंडाने म्हटल्याने म्हणणाऱ्याला हिरा किंवा

मुंगीया मिळेल का?जर असे म्हणणाऱ्याच्या घरी हिरा किंवा मुंगीया आले असते तर सतसाहेब,सतसाहेब म्हणणाऱ्याच्या घटात सतसाहेब जागृत होईल. ।।१०।।

**चिंत्राँमण कूं बहोत सरावे ।। चिंत्राँमण चिंत्राँमण गावे ।।**
**यू चिंत्राँमण पावे कोई ।। तो स्मरथ कहयाँ पार तम कोई ।।११।।**

चिंतामणीला खुप शोभा केली आणि चिंतामणी,चिंतामणी असे रात्रं दिवस भजले तर चिंतामणी प्राप्त होईल का?जर प्राप्त होत असेल तर समर्थाचा जप करुन समर्थ घटात प्रगटला असता आणि तुम्ही होणकाळातून पार झाले असते.।।११।।

**कलब्रछ कलब्रछ कहे नर नारी ।। तो कहाँ पावे कह्ो उचारी ।।**
**जो कलपना वारी सब जावे ।। तो समरथ साहेब कहे पद पावे ।।१२।।**

जर कोणी स्त्री–पुरुष कल्पवृक्ष–कल्पवृक्ष करुन रात्रंदिवस जप करतात त्यांना कल्पवृक्ष प्राप्त होतो का?त्याने केलेली कल्पना पुर्ण होते का?जर त्याचे कल्पवृक्ष कल्पवृक्ष रात्रंदिवस जप केल्याने कल्पवृक्ष प्रगट झाला असता तर समर्थ साहेब जपल्याने समर्थ साहेब प्राप्त होईल. ।।१२।।

**इमरत इमरत कहे नर सोई ।। इमरत कहयाँ न जीवे कोई ।।**
**यू मुख का जाम जाप सारा ।। मोख न पावे हे कोई बिचारा ।।१३।।**

अमृत–अमृत हा जाप करुन अमृत प्रगट होऊन कोणी अमर होते का?तर कोणी अमर होत नाही अशाच प्रकारे सतसाहेब,राम,समर्थ,समर्थसाहेब हे ५२ अक्षरातील शब्द मुखाने जपल्याने कोणी मोक्ष प्राप्त करत नाही. ।।१३।।

**अमर जड़ी अमर फळ भाई ।। नित परत कहो मुख सें आई ।।**
**कहो अमर कुण हुवो जग माह्ी ।यू सत साहेब कहयाँ ही मोख न जाही ।१४।**

अमरजडी–अमरजडी किंवा अमरफळ–अमरफळ नित्य मुखाने म्हटल्यावर जगात कोणी ही अमर झाले नाही असेच सतसाहेब,सतसाहेब,समर्थ,राम म्हटल्याने कोणी मोक्षाला गेले नाही आणि जात नाही. ।।१४।।

**राम कहो तो मोख न पावे ।। सत साहेब कहे कदे नव जावो ।।**
**समझो सकळ ग्यान कर भाई ।। सतस्वरूप नह्ी अे माई ।।१५।।**

राम म्हटल्याने कोणी मोक्षाला जात नाही तसेच सतसाहेब म्हटल्याने ही कोणी मोक्षाला जात नाही.जगातील ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुष सर्व समजा.जे सतस्वरुप ध्वनीच्या रुपात सतगुरुमध्ये राहतात ती ध्वनी या बोलून दाखवणाऱ्या शब्दांमध्ये नाही.ती ध्वनी फक्त सतगुरुतच राहते ती ध्वनी ५२ अक्षरांचे शब्द सतस्वरुपाच्या स्वभावानुसार सतस्वरुपा करीता उपयोग केल्याने त्याच्यात येत नाही.जसे संताच्या देहात सतसाहेब आहे ती ध्वनी नेहमी राहणारी आहे म्हणून ती सत्य आहे व सर्वात श्रेष्ठ आहे म्हणून साहेब

आहे अशा ध्वनीच्या स्वभावानुसार त्या ध्वनीचे नाव सतसाहेब आहे त्याला प्रगट करायचे आहे तर सतसाहेब प्रगट झालेला संतच लागेल त्याच्या स्वभावानुसार ५२ अक्षरांचे शब्दाचे उच्चारण करुन तो सतसाहेब घटात प्रगट होणार नाही(त्याला प्रगट झालेले सतगुरुच लागतील)? ।।१५।।

**कहाँ माँग कर माया लावे ।। उधम कियाँ सुई माया पावे ।।**

**सत बिग्यान कोण बिध लीजे ।। समझ समझ यो उत्तर कीजे ।।१६।।**

माया मागुन मिळवू शकता व उद्योग करुन प्राप्त करु शकता परंतु सतस्वरुप हे गुरुकडून मागुन ही मिळत नाही तसेच मन,पाच आत्मा तसेच धनाने गुरुचे कार्य केल्यानेही मिळत नाही असे सतविज्ञान सतगुरुपासून ज्या विधीने मिळते त्याची समज घटात आणून तो सतसाहेब सतगुरु कडून आपल्या घटात प्रगट करुन घ्या. ।।१६।।

**करणी कर माया फळ पावे ।। मुख मंत्र देवत धावे ।।**

**सत अण बण पाठ न कोई ।। मंत्र ग्यान ना केबत होई ।।१७।।**

करणी करुन मायेचे फळ प्राप्त करता येते मुखाने मंत्र जपून देवतांना प्रगट करता येते.असा सत्तचा कोणता मंत्र नाही,पाठ नाही,ज्ञान नाही किंवा तो कोणाच्या मुखाने सांगण्यात नाही याकारणाने घटात तो सतस्वरुप बोलण्याच्या नामांनी प्रगट करत नाही. ।।१७।।

**के सुखराम हाक दे भाई ।। मानो बचन हमारा आई ।।**

**बाणी माही राम नही कोई ।। ना साहेब समरथ सुण होई ।।१८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्वांना ज्ञानाने बजाऊन-बजाऊन सांगतात की आधी झालेल्या संतांच्या वाणीत तसेच आता वर्तमानात जे संत आहेत त्यांच्या ही वाणीत तसेच आता वर्तमानात जे संत आहेत त्यांच्या ही वाणीत जे सतस्वरुपी संतांच्या घटात अखंड्ति ध्वनी प्रगट होते ज्याला जग ५२ अक्षरांमध्ये राम,समर्थ म्हणतात ते नाही.।१८।

**ओ तो अेक ग्यान सुण होई ।। ज्यू जग मे रंग राग हुवे सोई ।।**

**यू बाणी बेद बिचारा ।। क्या सुर्गण क्या निर्गुण प्यारा ।।१९।।**

ही वाणी संतांनी जगाला शरीराच्या आतल्या ध्वनीला वर्णन करुन अक्षरांमध्ये समजेल असे सांगितलेले ज्ञान आहे ही अशी वाणी म्हणजे ऐकून-ऐकून श्रोत्यांना आनंद येईल परंतु हा आनंद सतस्वरुपाच्या अखंडित ध्वनीचा होत नाही.हा आनंद जसे जगात राग रागिण्या म्हणजे गाणे ऐकल्यावर होतो त्या सारखा राहतो हा मायावी आनंद सर्व प्रकारचे सगुण तसेच निर्गुण आणि केवली संतांचे वेद आणि वाणींनी मिळतो केवळी संतांच्या वाणीचा आनंद सगुण व निर्गुण संतांच्या वाणीहून निराळा राहत नाही.।।१९।।

नट बाजीगर ख्याल बणावे ।। बहोत बिध ख्याल सांग ले आवे ।।
देख देख सब राजी होई ।। नफो नछु नही दे धन खोई ।।२०।।

जसे नट नाना विधीचे सोंग व बाजीगर नाना विधीचे खेळ करतो ते नटाचे सोंग व मदारीचे खेळ बघुन–बघुन सर्व खुश होतात परंतु बघणाऱ्याला नफा काहीही होत नाही उलट नट व बाजीगरांना पैसे देऊन गमावतात अशाचप्रकारे मोक्षाला गेलेले केवली संतांची वाणी वाचून–वाचून तसेच हरजस ऐकून–ऐकून जीव खुश होतो परंतु जीवाला सतसाहेबाची ध्वनी प्रगट होत नाही उलट अमुल्य श्वास गमवून देतात.।।२०।।

यू बाणी ग्यान बेद सुण भाई ।। खुसी रहो सुण जग के माही ।।
गिरे को गुन्हो बंधो सिर सोई ।। बाणी सुणे ते मुक्त नही होई ।।२१।।

अशाप्रकारे संतांची वाणी ज्ञान व संतांकडून वेद ऐकल्याने हंस जगात खुश होऊन राहतो परंतु या वाण्या ऐकून हंस काळापासून मुक्त होत नाही वाणी ऐकली आणि हंस तसा चालला नाही तर त्या हंसाच्या शिरावर परमात्म्याचा गुन्हा बांधला जातो जोपर्यंत वाणी ऐकली नव्हती तोपर्यंत त्याला समर्थ काय आहे हे माहीत नव्हते तो समर्थ साहेब माहित नसल्याकारणाने हंसावर दोष नव्हता परंतु वाणीने समर्थ साहेब कसे जाणावे हे माहीत झाल्यानंतर तो तशा संताला शोधत नाही आणि सतस्वरुप प्रगट करत नाही तर त्याच्या शिरावर हा गुन्हा येतो. ।।२१।।

कहा सुरगुण कहा निरगुण भाई ।। कहा भेद सुंही भेद कहाई ।।
ओ तो अेक ग्यान सुख होई ।। नाना बिध कर सीखो कोई ।।२२।।

जसे सगुण आणि निर्गुणचे ज्ञान नाना प्रकारे ऐकले आणि शिकले याच्याने जे सुख मिळाले त्याचप्रकारचे सुख सतस्वरुपाचे ज्ञान ऐकल्यावर आणि शिकल्यावर मिळते हे सतस्वरुपाचे ज्ञान ऐकल्याने माया काय होणकाळ काय सतस्वरुप काय हा भेद ज्ञानाने शब्दरुपाने समजते जाते परंतु या भेदाच्या पलिकडचे कुद्रतरुपात म्हणजे विज्ञान रुपात सतस्वरुप प्रगट होण्याचा भेद प्रगट होत नाही. ।।२२।।

सब जंतर सब मंतर सारा ।। अे माया रूपी सरब बिचारा ।।
अे सोहं से पेदा होई ।। या मे परम मोख नही कोई ।।२३।।

सर्व जंतर मंतर ही त्रिगुणी माया आहे हे जंतर मंतर सोहम पिता आणि इच्छा माता यांच्या भोगाने पैदा झाले आहे हे मायेचे बीज आहे हे सतस्वरुपाचे बीज नाही या कारणाने जंतर मंतरच्या साधनेमध्ये परममोक्ष नाही. ।।२३।।

सब ही जाप नाम सब बाणी ।। ओं ऊँकार कहे सब आणी ।।
सो सोहं से पेदा होई ।। माया मूळ आद हे ओई ।।२४।।

जगाचे सर्व जाप,नाम आणि सर्व वाणी तसेच ओअमपासुन जन्मलेले सोहम हाच मायेचे

आद मुळ आहे.म्हणून मायेपासून जन्मलेले जाप,नाम,सर्व वाणी ओअंकार ही माया आहे. ।।२४।।

**करामात करतूत कहावे ।। सो ओऊं सोहम कर पावे ।।**
**अे सब ख्याल माया सुण होई ।। घड़ भंजण माया को दोई ।।२५।।**

करामात करतूत हे ओअम सोहमची भक्ती केल्याने संतामध्ये येते त्या करामात करतूतने ते जन सृष्टीला क्षणात घड्वून देतात आणि तेच सृष्टीला क्षणात मिटवून देतो ह्या दोन्ही घडभंजनाच्या करामाती मायेच्या आहेत.असे भारी भारी चमत्कार करतो किंवा करेल तरीही ते जन परममोक्षाला जात नाही.त्या जनामध्ये मायेचे पराक्रम प्रगट झाले आहे, सतसाहेब प्रगट नाही झाला आहे आणि जोपर्यंत सतसाहेब प्रगट होत नाही तोपर्यंत कितीही मायेचे घडभंजन सारखे भारी भारी खेळ केले तरीही ते संत काळापासून सुटत नाही. ।।२५।।

**इण को ध्यान करे नर कोई ।। करणी सकळ इणी की होई ।।**
**मुद्रा कूंची साझन सारा ।। ध्यान ग्यान सब करम बिचारा ।।२६।।**

सर्व प्रकारच्या करण्या मुद्रा,कुंची,साधना,ध्यान,ज्ञान,कर्म हे सर्व ओअम सोहम पासून जन्मले आहे म्हणजे इच्छा आणि ब्रम्हपासून जन्मले आहे यामुळे सर्व करण्या,मुद्रा, कुंची,साधना,ध्यान,ज्ञान,कर्म हे माया प्रगट होण्याचे साधन आहे हे सतस्वरुप प्रगट होण्याचे साधन नाही. ।।२६।।

**जेसी करे ते सो फळ पावे ।। चमतकार बाहेर बण आवे ।।**
**जोत उजाळा देखे भाई ।। हीरा मूरत या तन माई ।।२७।।**

येथे जसे कराल तसे फळ मिळेल यांच्या योगाने बाहेरचे चमत्कार होतील आणि यांच्या योगाने शरीरात ज्योती दिसू लागते आणि प्रकाश दिसू लागतो,हिरे दिसू लागतात आणि मुर्ती शरीरात दिसू लागते.।।२७।।

**साझन करे नर दे दिखला ई ।। जे माया छाया परम बंब भाई ।।**
**आँख मूंदियाँ दीसण लागे ।। माया जाळ भरम का जागे ।।२८।।**

कोणी साध शिष्याला डोळे बंद केल्यावर छायेचे प्रतिबिंब दाखवितो हे प्रतिबिंब दाखविणे मायेचे जागृत झालेले जाळ आहे म्हणजे भ्रमाचा जागृत झालेला जाळ आहे.याच्यात सतस्वरुप जागृत होण्याची विधी नाही. ।।२८।।

**ध्यान कियाँ सुंई निजऱ्या आवे ।। सो सब माया चेन कवावे ।।**
**रज मातर मूरत कण होई ।। तब लग ब्रम्ह हे नही कहुँ तोई ।।२९।।**

ध्यान केल्यावर रजमात्र मुर्तीही ध्यानात दिसत असेल तर समजावे ते त्रिगुणी मायेचे चरित्र आहे.तोपर्यंत सतस्वरुप तर दूर ब्रम्ह ही मिळाला नाही असे समजावे.।।२९।।

**ब्रम्ह कळा सोई केहतन आवे ।। ना मूरत ना ज्योत कहावे ।।**
**ना कछू आवाज उजाळो ह्रोई ।। ना रंग रूप कहेण नही कोई ।।३०।।**

मायेचे चमत्कार,मुर्ती,ज्योत,आवाज,उजेड,रुप,रंग हे ब्रम्हकलेचे लक्षण नाही हे मायेचे लक्षण आहे स्वत: पारब्रम्ह हा अमुरत आहे पारब्रम्हला स्वत:चा प्रकाश नाही,स्वत:चा आवाज नाही,स्वत:चे रुप नाही,स्वत:चा रंग नाही,स्वत:ची मुर्ती नाही,स्वत:ची ज्योती नाही अशा पारब्रम्हची ब्रम्हकला ही ब्रम्हज्ञान रुपात प्रगट होते ती डोळ्यांनी दिसणारी, कानांनी ऐकणाऱ्या वस्तुंपासून प्रगट होत नाही ब्रम्हकला ही मायेने दाखविली जात नाही.ती फक्त ज्ञानाने समजली जाते ती मायेच्या चमत्कार चरित्रांमध्ये वेगळी आहे. जोपर्यंत साधुला मुर्ती,ज्योत,आवाज,उजेड,रुप,रंग दिसते तोपर्यंत त्या साधुला ब्रम्हकला प्रगट झाली नाही हे समजणे.।।३०।।

**पारब्रम्ह के रूप नही कोई ।। ना कळ तोल मोल नही होई ।।**
**जिणय ऊपर सत्त सब्द बिचारा ।। वो सुण देस ब्रम्ह सेंई न्यारा ।।३१।।**

पारब्रम्हला मायेसारखे रुप,रंग नाही याकरीता पारब्रम्हच्या कलेला मायेची ज्योत, उजेड,आवाज,रंग,रुपाशी तोलमोल करता येत नाही सतशब्दाचा देश हा पारब्रम्हच्याही वर आहे जेव्हा जग व ज्ञानी,ध्यानींना पारब्रम्हचा तोलमोल समजत नाही तर पारब्रम्हच्या पुढच्या सतशब्दचा तोलमोल मुखाच्या शब्दांनी किंवा मायेच्या लक्षणांनी कसा समजेल? ।।३१।।

**सब्द केहेर कोई जुक्त बतावे ।। ने: अंछर पकड़ सत्त पर लावे ।।**
**जो बिश्वास सब्द मे बोले ।। ता ऊपर करणी तोले ।।३२।।**

संत धामाला पोहचून गेले संत जेव्हा धरावर होते तेव्हा शिष्याना सतशब्द समजला पाहिजे याकरीता मायेच्या भाषेत सतस्वरुपाची वाणी सांगितली संतांची वाणी माया असल्या कारणाने संतांसोबत जात नाही म्हणून ती जगातच राहते वाणी मध्ये संतांनी मोक्षाला जाण्याची युक्ती सांगितलेली असते मागे कोणी साधक वाणीचे शब्द वाचून-वाचून सांगितलेल्या विधीवर दृढ विश्वास ठेवून साधना करतो आपल्या मनाला व शरीराला वाणीजीत सांगितल्यानुसार तोलून मोलून ठेवतो.मनात निश्चिल होऊन जगाच्या दुसऱ्या कोणत्या मतात जात नाही संताना सत्य पकडून संताच्याच मतात राहतो इतके केल्यावरही त्या संतामध्ये सतशब्द प्रगट होत नाही. ।।३२।।

**सब्द कहे म्हे तारूँ सोई ।। जो बिश्वास हमारो होई ।।**
**ने: चो पकड़ ना डोळे भाई ।। तो परम मोख ले जाऊँ आई ।।३३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाला सांगतात की,वाणीमध्ये सांगितलेले ज्ञान सर्व सत्य आहे जेव्हा शरीराने संत होते तेव्हा संत घटातील सतशब्दाच्या आधाराने

जगाला समजेल असे ज्ञान सांगत होते संतांनी ज्ञान सांगितले की,जो माझ्यावर निश्चित होऊन विश्वास ठेवेल आणि मायेच्या तसेच ब्रम्हच्या भक्त्याच्या घेऱ्यात जाणार नाही त्या सर्वांना मी तारेल आणि ज्यांनी ज्यांनी निश्चल होऊन संतावर विश्वास ठेवला आणि माया व ब्रम्हच्या घेऱ्यात डोलले नाही ते सर्व संताच्या उपस्थितीत मोक्षाला गेले.।।३३।।

**आ सत्त बात असत नही कोई ।। पण सबद कहयो ता दिन सत्त होई ।।**
**अब ओ सब्द मिथ्या होई ।। कहयो जके नही जगमे कोई ।।३४।।**

ही तारण्याची संताची गोष्ट सत्य आहे,खोटी नाही हे तारण्याचे शब्द ज्यावेळी सांगितले होते तेव्हा ते सत्य होते आज हे सांगितलेले शब्द तारु शकत नाही कारण की,ज्या सत्तेच्या आधाराने संत तारुन राहीले होते ती सत्तकला सांगितलेल्या वाणीत राहीली नाही ती संतांसोबत चालली गेली. ।।३४।।

**देणी चीज कही थी भाई ।। से बंदा सुण गये सिधाई ।।**
**कहो वा चीज कहाँ सु लावे ।। सब्द रत्ति वा के संग जावे ।।३५।।**

एखादा भाग्यरती पुरुष जगात राहतो तो पुरुष जोपर्यंत जगात राहतो तोपर्यंत तो ज्यांना ज्यांना जी-जी वस्तु पाहिजे ती वस्तु देणे मान्य करतो आणि तसे त्यांना ती वस्तु देतो.वय झाल्यावर तो शरीर सोडतो त्याकारणाने तो भाग्यरती पुरुषा सोबत चालली जाते.याकारणाने मागे कुटूंबवाल्याजवळ रती राहत नाही आता मागे कुटूंब परीवाराचे लोक कोणाला काही देणे पाहिल तर ते रती नसल्या कारणाने देऊ शकत नाही अशाचप्रकारे संताच्या मागे संतांची वाणी राहते परंतु ती वाणी शब्द सांगणारे संतासोबत सतशब्दाची सत्ता चालली गेलेली राहते त्या शब्दाची सत्ता वाणीमध्ये राहत नाही. ।।३५।।

**नाव पुर्ष का हे जग माँही ।। बाता अरथ तके सब याँही ।।**
**लेण देण कीया बोहारा ।। उण समी ये सब सत्त पियारा ।।३६।।**

भाग्यरती गेल्या नंतर जगात त्याचे नाव त्याच्या गोष्टी,त्याच्या प्रती समज जशीच्या तशी राहते परंतु घेण्या-देण्याचे व्यवहार तो जिवंत होता तोपर्यंतच होते आता ते बंद होऊन गेले जसे भाग्यरतीचे नाव,गोष्टी,पराक्रम त्याच्या गेल्यानंतर जसेच्या तसे राहते परंतु तो जेव्हा होता तसा व्यवहार त्याच्या गेल्यानंतर चालत नाही.अशाच प्रकारे सतस्वरुपी संताचे नाव,पराक्रम,गोष्टी त्याच्या गेल्यानंतर ही जगात जसेच्या तश्या राहतात परंतु शिष्यात सतस्वरुप प्रगट करुन देण्याची सत्ता मागे राहत नाही. ।।३६।।

**भाग पुर्ष सुण जग मे आई ।। कीयो नाव जक्त के माई ।।**
**जिण कूचीजा देणी कीवी ।। वा कू माया बहोत बिध दीवी ।।३७।।**

भाग्य पुरुष जगात आला जगात येऊन जगातील लोकांना ज्या ज्या वस्तु देणे मान्य

केले त्या सर्व नाना प्रकारच्या वस्तु आणि माया दिली आणि आपले भाग्यपुरुष असे नाव रोशन करुन चालला गेला. ।।३७।।

**लारे कोई चलाई चावे ।। तो द्रब चडावे कहाँ सु लावे ।।**
**भाग रत्ति गई जे संग भाई ।। बचन स्वाल रहे जग के माई ।।३८।।**

भाग्यपुरुषाचे शरीर सुटून गेले त्याच्या सोबत भागरती चालली गेली.त्याचे वचन, प्रश्न,नाव मागे जसेच्या तसे राहून गेले.त्याचे वचन व त्याने प्राप्त केलेले नाव बनवून ठेवण्या करीता त्याच्या वंशाचा कोणी पुरुष ती रीत चालवू पाहील तरी ही ती कशी चालवेल?ती रीत चालविण्या करीता धन-दौलत पाहिजे ती धन-दौलत मागच्यांजवळ नाही आहे मग ज्यांना ज्या-ज्या वस्तु पाहिजेत त्या देण्याकरीता तो धन-दौलत कोठून आणणार? ।।३८।।

**यू बचन सवाल जन का सब सारा ।। से देह थका सत्त सब प्यारा ।।**
**अब वा चीज न पावो कोई ।। सो भा सुणर खुसी रहो सोई ।।३९।।**

असेच संतांचे वचन आणि प्रश्न संत देहात जेव्हा होते तेव्हा बरोबर होते संताने देह सोडल्यानंतर संतांसोबत सत्ता निघुन चालली गेली आणि आता तेच वचन व प्रश्न अमरलोक प्रगट करण्याकरीता खोटे आहेत त्या वचनांचा पराक्रम म्हणजे शोभा ऐकून जग त्या वचनांचा आंनद घेऊ शकतो परंतु त्याच्याने कोणालाही आनंदलोक मिळत नाही. ।।३९।।

**कहे सुखराम बाद नही कीजे ।। गम कर ग्यान सोझ उर लीजे ।।**
**जिण जन पंथ चलाया जूवा ।। वे अे सो कहो पछे कै हुवा ।।४०।।**

पोहचलेल्या संताच्या मागे त्या संताच्या नावावर काही लोक पंथ चालवतात अशा पंथवाल्यांना आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले की तुम्ही ज्या संताचा पंथ चालवून राहिले आहे त्या पंथात आज सत्ता नाही ती सत्ता जेव्हा संत गेले त्यावेळी त्यांच्यासोबत चालली गेली तेव्हा ते वाद करतात त्यावर अशा वाद करणाऱ्यांना आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले की खोटा वाद करु नका.ज्ञानाने खरी समज हृदयात आणा आणि पहा जसा तुमचा पंथ आहे तसे आणखी ही अन्य केवली संतांचे पंथ जगात आहेत जर या केवली संतांच्या पंथात अमरलोकात जाण्याची रीत त्यांच्या गेल्यानंतर आजही जिवंत आहे तर तुमच्या पंथाने ही अमरलोकात जाता येईल ज्ञानाने पहाल तर समजेल की त्यांच्या पंथात अमरलोकात जाण्याची रीत नाही राहिली जेव्हा त्यांच्या पंथात परमपदात जाण्याची रीत त्या संताच्या जाण्याची रीत त्या संताच्या जाण्याच्या मागे राहीली नाही तर तुमच्या पंथात कशी राहील?याचा वाद न करता ज्ञानाने विचार करा. ।।४०।।

कहे सुखराम न्याव हम कीयो ।। भरम भांज हंसन को दीयो ।।
न्हे चळ हुवाईं मोख नही पावे ।। रखे बिश्वास पार नही जावे ।।४१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी वाद करणाऱ्यांना व जगाच्या हंसांना जगाचे अनेक दाखले सांगून समजविले की गेलेल्या केवली संतांच्या वचनांवर विश्वास ठेवून व निश्चल होऊन आजपर्यंत कोणी अमरलोकात गेले नाही आणि पुढे कोणी जाणार नाही जगाच्या ज्ञानाने न्यायीक दाखले दिल्यामुळे वादी पुरुषाचा आणि हंसांचा भ्रम नाश झाला. ।।४१।।

अनंत करे कळ किमत लावे ।। ताही सतस्वरूप की कळा न पावे ।।
कहे सुखराम सुणो सब ग्यानी ।। मान सके जे मानो आनी ।।४२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानींना सांगतात की,मनाची,तनाची,मायेची, ब्रम्हची तसेच मोक्षाला पोहचलेल्या संतांच्या वाणी नुसार की अनंत क्रिया नाना प्रकारच्या हिकमतीने केल्या तरीही सतस्वरुपाची कला घटात प्रगट होणार नाही माझ्या या ज्ञानाने केलेल्या न्यायाला जे मानू शकतात ते माझी गोष्ट माना. ।।४२।।

परम मोख अे बात न पावे ।। करणी कहैण सुणण मे आवे ।।
अे तो सकळ की मतारे भाई ।। माया पकड़ करो बस काई ।।४३।।

परममोक्ष या आधीच्या पंथाच्या वाणीच्या गोष्टींनी मिळणार नाही जे ज्ञान करण्यात येते,सांगण्यात येते ऐकण्यात येते ते ज्ञान ने:अक्षर ध्वनीची सत्ता राहत नाही हे मतानेच पकडून ठेवलेल्या मायावी सर्व गोष्टी राहतात या मतांनी माया वश मध्ये येऊन पकडली जाते.।।४३।।

हुवे प्रगट मुख आगल आवे ।। जो चावे सोई चेहेन बतावे ।।
सत्त सब्द कू ले किम कोई ।। केण सबद मे लेसन होई ।।४४।।

ती माया वश होऊन प्रगट होईल आणि ती मुखाच्या समोर येऊन जाईल जे पाहिजे ते चरित्र ती माया करुन दाखवेल परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की त्या सांगण्यात येणाऱ्या शब्दांमध्ये सतशब्दाचा लेश ही नाही मग या सांगण्यात येणाऱ्या शब्दाने जीव सतशब्द कसे प्रगट करु शकेल ? ।।४४।।

सत्त साहेब अजरावण होई ।। अे सिवरण करे नार नर कोई ।।
सच बिश्वास सत्त पर राखे ।। मिथ्या बचन भूल नही भाखे ।।४५।।

असे गुरुच्या सांगण्यानुसार काही स्त्री–पुरुष सत परमात्म्यावर विश्वास ठेवतात आणि तोंडाने असत्य वचन चुकूनही बोलत नाही व नेहमी सतसाहेब,अजरावण याचे रात्रंदिवस स्मरण करतात आणि सतसाहेब प्रगट झाला असे समजतात. ।।४५।।

तो पण हंस मोख नही जावे ।। उलटो जनम धरे दु:ख पावे ।।

ज्यू सत आया बिन जळी न कोई ।। बाता किया बिगोवो होई ।।४६।।

हे सर्व केल्यावर एकाही स्त्री-पुरुषाला सतसाहेब प्रगट होत नाही त्याकारणाने एकाही स्त्री-पुरुषाचा हंस मोक्षाला जात नाही उलट तो जगात जन्म धारण करतो आणि काळाचे दु:ख भोगतो जसे स्त्रीमध्ये सत्त आले नाही आणि जगात सत्त आले म्हणून गोष्टी केल्या जळण्याची वेळ आली तर घटात सत्त प्रगट न झाल्याकारणाने जळू शकली नाही सत्ता आल्याशिवाय सती होण्याची गोष्ट करुन घेतली आणि सती बनली नाही या गोष्टीने जगात थट्टा,फजीती,बेअब्रु झाली. ।।४६।।

सत्ती होण की बाता कीवी ।। जब जग पदवी मान सुण लीवी ।।
पछे जळे नही जे जाई ।। तो हाँसी करे सकळ जग माई ।।४७।।

स्त्रीने सती होण्याच्या गोष्टी केल्या जगाने ही त्या स्त्रीमध्ये सत्त प्रगट झाले म्हणून मानून घेतले आता पतीचे शरीर सुटले पतीच्या मागे तिच्यात सत न आल्याकारणाने ती जळाली नाही तेव्हा सर्व जगाने तिची हसी,मजाक,थट्टा केली. ।।४७।।

यू सत आया बिन कहे सत काँई ।। मै सती पीव संग हुऊँ जग माँई ।।
तो झूटी जळयो ना जावे कोई ।। यु सत साहेब कहे मोख न होई ।।४८।।

जसे स्त्रीने सत न येताच जगाच्या लोकांना सांगितले की माझ्यात सत्त आले आहे मी पतीसोबत सती होईल मी पती सोबत सतवाड्मध्ये जाईल असे सांगत राहीली एक दिवस पतीचे शरीर सुटले सती होण्याचा योग आला आता घटात सत्त तर प्रगट नव्हते आणि जगात माझ्यात सत आले असे खोटे सांगत गेली पती सोबत सतवाड्च्या लोकात जायचे आहे तर पतीसोबत जळावे लागते शरीरात सत आले नव्हते या कारणाने पतीसोबत जळू शकली नाही म्हणून पतीसोबत सतवाड्च्या लोकात जाऊ शकली नाही अशाचप्रकारे सतसाहेब,सतसाहेब करुन सतसाहेब प्रगट होऊन गेला असे जगात सांगत गेले अंतीम वेळ आली सतसाहेब घटात प्रगट नव्हता त्याकारणाने अमरलोक तर जाणे झाले नाही उलट जगात जन्म धारण करुन दु:ख भोगावे लागले. ।।४८।।

सत साहेब जब साचा भाई ।। सता सत्त की प्रगटे आई ।।
और सकळ हे को गति यारा ।। ज्यु सती संग हुवे लोक बिचारा ।।४९।।

तोंडाने बोलणारे सतसाहेब समर्थ हे शब्द खरे नाहीत हे मायेचे शब्द आहेत हा सतसाहेब तर तेव्हा खरा आहे जेव्हा तो सतसाहेब घटात सत्तेच्या रुपात प्रगट आहे बाकी सर्व सतसाहेब म्हणणाऱ्यांमध्ये सतसाहेब सत्तेच्या रुपात प्रगट झालेला नसतो जसे सती स्त्री सती होण्यास जाते तेव्हा कित्येक स्त्रिया तमाशा बघायला जातात बघणाऱ्यांमधुन एकाही स्त्री मध्ये सती स्त्री सारखे सत प्रगट झालेले नसते परंतु तेथे

काही स्त्रिया माझ्यातही सत प्रगट झाले आहे असे खोटेच सांगतात अशाचप्रकारे ह्या सतसाहेब म्हणणाऱ्यांची स्थिती असते.यांच्यात कबीरजी,दादुजी,दर्यावजी महाराज सारखे सतसाहेब प्रगट झालेला नसतो.परंतु त्यांचे ज्ञान वाचून आणि ऐकून आमच्यातही सतसाहेब प्रगट झाला असे सांगत राहतात. ।।४९।।

यू सत साहेब सब को नर नारी ।। मोख न जावो अेक बिजारी ।।
नर के संग जळी जा जाई ।। जिण मे सत प्रगटी ही आई ।।५०।।

मोक्ष तर तोच जाईल ज्याच्यात सतसाहेब प्रगट झालेला आहे जसे नारी मध्ये सत प्रगट झाले नाही ती पती सोबत जळायला जात नाही जेव्हा की ज्या स्त्री मध्ये सत प्रगट झाले आहे ती आपल्या पती बरोबर जळायला जाण्यात काही कसर ठेवत नाही बरोबर जळायला जाते तसेच सतसाहेब सतसाहेब सर्व स्त्री–पुरुष रात्रं–दिवस भले ही जपोत परंतु जपल्याने सतसाहेब एका ही स्त्री–पुरुषाच्या घटात प्रगट होत नाही यामुळे एकही मोक्षाला जात नाही.।।५०।।

ओर सकळ बस्ती संगे जावे ।। उलटा सकळ घरे चल आवे ।।
यू सत सत्त कहया मोख नही होई ।। नांव प्रगटे ज्याँ सत्त सोई ।।५१।।

बाकी वस्तीच्या सर्व स्त्रिया व पुरुष सतीसोबत अग्नीडागाच्या जागेपर्यंत चालतात अग्नीडाग दिल्यानंतर सर्व लोक पलटून आपआपल्या घरी परत येतात असेच सत सत म्हटल्याने मोक्ष होत नाही ते सत प्रगट झाले तरच मोक्ष होतो नाही तर जगात परत जन्म धारण करतो. ।।५१।।

के सुखराम मां भूलो कोई ।। मुख की कहेण झूट सब होई ।।
मंत्र सिमरण जप सार ।। कल मुद्रा बिस्वास बिचारा ।।५२।।

अशाप्रकारे संताला राम म्हणजे परमात्मा मिळाला आहे ते कसे ओळखतात ते सर्व खरे चिन्ह मला सांगा जग त्या मनुष्याच्या घटात राम प्रगट होण्यामुळे संत समजतात ते कसे समजतात असे सर्व खरे चिन्ह मला व जगाला सांगा. ।।५२।।

।। कुंडल्यो ।।

जब गणेस कहे गुरूदेवजी ।। कियो न्याव सत्त छाण ।।
अब कीरपा करके आ कहो ।। मोख जाय किम प्राण ।।
मोख जाय किम प्राण ।। बिध तम अेक न राखी ।।
सुणण कहण प्रत ध्यान ।। जोत मिथ्या कर भाखी ।।
जिण जिण बिध हंस पहुँच सी ।। सोही बिध कहीये आण ।।
जब गणेस कहे गुरूदेवजी ।। कियो व सत्त छाण ।।५३।।

तेव्हा गणेश व्यासाने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,तुम्ही सत्तचा

न्याय केला आता कृपा करुन हे सांगा की प्राण मोक्षाला कसा जाईल?तुम्ही जगाची एकही विधी ठेवली नाही ऐकणे,सांगणे,प्रतिमा,ध्यान,ज्याती हे सर्व खोटे म्हणून सांगितले आता ज्या-ज्या विधीने हंस अमरलोक पोहचेल ती सर्व विधी आणून सांगा. ।।५३।।

।। चौपाई ।।

**धन तो बहोत सहा घर होई ।। चाकर हकम राजा के साई ।।**
**परचा बहोत देव सो देवे ।। मन की जाण साणी लेवे ।। ५४।।**

धन सावकाराच्या घरी खुप असते या खुप धनाच्या गुणाने तो मनुष्य सावकार आहे हे समजते चाकर तसेच हुकूम बजावणारे राजाकडे खुप राहतात या गुणाने राजा ओळखता येतो पर्चे चमत्कार देव खुप देतात त्या गुणाने देवता ओळखला जातो शगुन समजणारा मनाची गोष्ट जाणून घेतो या गुणाने शगुनी ओळखता येतो.।।५४।।

**अब राम मिल्याँ सु का गुण होई ।। सो सत्त चेन बतावो मोई ।।**
**इस कू राम मिल्या जग जाणे ।। कहो क्या देख रूं संत बखाणे ।।५५।।**

परंतु राम मिळाल्याने यांच्या शिवाय काय जास्त गुण असेल ते सर्व खरे चिन्ह (निशाण)मला सांगा की,याला राम मिळाला आहे असे सर्व जग जाणेल आणि त्या संताचे काय चिन्ह(निशाणी)पाहून हा संत आहे असे वर्णन करा.।।५५।।

**बाणी कहे कहे कवेसर भाई ।। जिण घट कहे सरसती आई ।।**
**अगम निगम का अर्थ बतावो ।। सो चारण भाट सोझ सब लावे ।।५६।।**

कविश्वर कविता करतात तर त्यांच्या घटात सरस्वती आली असे म्हणतात जसे कविश्वर कविता गातात तसेच चारण भाट गातात आणि अगम निगमचा अर्थ सांगतात परंतु चारण भाटात सतस्वती प्रगट झाली असे कोणी म्हणत नाही. ।।५६।।

**अनहद नाद घुरे सोही माया ।। उलट चड़े सोई आतम भाया ।।**
**प्रत बंब पाँचू रंग होई ।। ध्यान धर रूं देखे नर कोई ।।५७।।**

कोणाच्या शरीरात अनहद घुरतो.कोणाच्या शरीरात आत्मा उलटून चढतो कोणी पुरुष ध्यानात पाच रंग बघतो हे सर्व तुमच्या सांगण्याने माया आहे मग राम मिळण्याची खुण काय आहे? ।।५७।।

**नेण मूंद कोई मूरत जोवे ।। तो प्रतिबंब थूळ को होवे ।।**
**दासा तन गहे नर कोई ।। तो कंगाल बहोत जग होई ।।५८।।**

डोळे बंद करुन कोणी मुर्ती बघतो तर कोणी स्थुल शरीराचे प्रतिबिंब बघतो परंत तुमच्या सांगण्याने हे सर्व माया आहे हे राम नाही तर संतामध्ये राम प्रगट झाला हे जगाने कसे जाणावे?दास्यत्वभाव करणाऱ्याला राम मिळाला आहे असे समजतात तर जंगलात कंगाल खुप आहेत म्हणजे दास्यत्व करणाऱ्यालाही राम मिळाला नाही.।।५८।।

**मस्त मान अभ मान न राखे ।। पाँचूं भोग परख नही चाखे ।।**
**तो बेड़ा सुणो बहोत जग होई ।। मुरख तके ना समझे कोई ।।५९।।**

कोणी ज्ञानात मस्त राहून मान आणि अभिमान ठेवत नाही व पाची इंद्रियांचे(शब्द, स्पर्श,रुप,रस,गंध)भोगा विना पारखताच चाखतो यांना राम मिळाला आहे असे मानले तर जगात पागल तसेच मुर्ख खुप आहेत ते ही मस्त राहतात मान अभिमान राखत नाही आणि इंद्रियांचे भोग विना पारखूनच घेतात याचा अर्थ ज्ञानाने मान अभिमान ठेवत नाही आणि पाची भोग विना परिक्षा घेतो त्यालाही राम मिळाला नाही. ।।५९।।

**अब कहो जी राम कोण बिध भाई ।। ता मिलिया सो परखो आई ।।**
**सो तक चेहेन कहो सुझ आई ।। राम कोण बिध जाणो ।।६०।।**

तर आता ज्याला राम मिळाला आहे त्याला परखण्याची विधी सांगा त्या संताला राम मिळाला आहे ते सर्व चिन्ह मला समजतील असे सांगा. ।।६०।।

**जहाँ जो पूछ पराक्रम होई ।। सो परसे माया कहुँ तोई ।।**
**छोटी बड़ी कळा सों कुहावे ।। गेब अचानक प्रगट आवे ।।६१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज गणेश पंडीतला सांगतात की,छोट्या-मोठ्या कलेला घेऊन तर गेबपासून अचानक प्रगट होणाऱ्या सर्व कला माया आहे हे साधुच्या माये मध्ये पोहच तसेच पराक्रमानुसार प्रगट होणाऱ्या कलेपासून तर छोट्या-मोठ्या कले पर्यंत सर्व माया आहे ते राम नाही. ।।६१।।

**अब तम चीनो राम कोण बिध आणी ।। सो मत तुमरा कहो बखाणी ।।**

या सर्व कलांना लक्ष्यात ठेवून राम मिळाला हे तुम्हीच ओळखा व तुमचे मत सांगा.

।। इति सत्त स्वरूप आनंद पद ने: अंछर निज नाव ग्रंथ सम्पुरण ।।